# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०५ जुलै, २०१८ / आषाढ १४, १९४० (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | वित्त व नियोजन, वने मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री | |
| (३) | वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री | |
| (४) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |
| (५) | जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री | |
| (६) | रोजगार हमी, पर्यटन मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८६**

---

### राज्यातील अनाथ विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये आरक्षण देण्याबाबत

**(१) * ४१८३८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रामराव वडकुते, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अनिल भोसले, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनाथ मुलांना कोणताही जातीचा दाखला नसल्याने त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून शासकीय व निमशासकीय नोकरीपासुन वंचित रहावे लागत असून शासनाने त्यांच्यासाठी नोकरी व शिक्षणामध्ये १ टक्का आरक्षण देण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे,
(२) असल्यास, नोकरी व शिक्षणाचा लाभ घेण्यासाठी संबंधित विभागाने अनाथ प्रमाणपत्राची अट घातली असून मराठवाडयातील अनाथ विद्यार्थ्यांकडे प्रमाणपत्र नसल्याने त्यांना लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनाथ विद्यार्थ्यांना जातीचा दाखला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) अनाथ मुलांना दिनांक ०६/०६/२०१८ व दिनांक ०९ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांच्याव्दारे अनाथ प्रमाणपत्र वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच शिक्षक यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(२) * ४१२७४ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९४८ ला दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षक यांना सातवा वेतन आयोग लागू करावा, पाच दिवसांचा आठवडा करुन त्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० करण्याबाबत तसेच इतर प्रलंबित मागण्यांसाठी लवकर निर्णय घ्यावा, याबाबतचे निवेदन राजपत्रित अधिकारी महासंघाने तसेच कर्मचारी संघटनेने मा.मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकारी व कर्मचारी संघटनेने दिलेल्या निवेदनाचे तसेच याबाबत शासनाने नियुक्त केलेल्या समितीने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय. राजपत्रित अधिकारी महासंघाने सातवा वेतन आयोग, पाच दिवसाचा आठवडा, सेवानिवृत्तीचे वय ६० करणे आणि इतर प्रलंबित मागण्यांबाबत मा.मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांना दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी निवेदन दिले आहे.

(२) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने दिलेल्या निवेदनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे :-

सातव्या वेतन आयोगासंदर्भातील बक्षी समितीचा अहवाल ऑगस्ट, २०१८ अखेरपर्यंत सादर करावा व त्यावर महिन्याभरात निर्णय घ्यावा, गेल्या २७ महिन्यांच्या थकबाकीसंदर्भात निर्णय घ्यावा, अंतरिम वाढ सुरु करावी, केंद्राप्रमाणे महागाई भत्ता वाढी व थकबाकी वेळचेवेळी देणे, ५ दिवसांचा आठवडा, बालसंगोपन रजा, राज्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय केंद्राप्रमाणे ६० वर्षे करणे, चक्राकार विभागवार नियुक्त्या, रिक्त पदे भरणे, अधिकाऱ्यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नेमणूक देणे, विविध विभागातील प्रलंबित प्रश्न, मारहाण-दमबाजीबाबत परिणामकारक कायदा इ. संदर्भात निवेदनात मागण्या केल्या आहेत. वरील मागण्यांपैकी सातवा वेतन आयोग, सेवानिवृत्तीचे वय केंद्राप्रमाणे ६० वर्षे करणे आणि अधिकाऱ्यांच्या

पाल्यांना अनुकंपा तत्वावर नेमणूक देणे या मागण्यांसंदर्भात समित्या नियुक्त केल्या आहेत. सातव्या वेतन आयोगासंदर्भातील बक्षी समिती, (राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७) सेवानिवृत्तीचे वय केंद्राप्रमाणे ६० वर्षे करण्यासंदर्भातील श्री.बी.सी.खटुआ समिती आणि अनुकंपा नियुक्ती धोरणाचा आढावा घेण्यासाठी गठीत केलेल्या मंत्रिमंडळ उपसमिती या समित्यांचे अहवाल प्रतिक्षाधीन आहेत तसेच ५ दिवसाचा आठवडा करणेबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर योग्यवेळी निर्णय घेण्यात येईल.

(३) व (४) महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने दिनांक ३० मे, २०१८ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त विचारविनिमय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महासंघाच्या सर्व मागण्यांवर मुद्येनिहाय चर्चा होऊन मागण्यांसंदर्भात उचित कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत.

-----------------

## जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कोकणाकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याबाबत

**(३) * ४१६२८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेंतर्गत पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयात जलक्रांती आली असताना कोकणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यासाठी उद्दिष्ट असलेल्या १६४७ कामांपैकी केवळ २२५ कामे पूर्ण झाली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामे अपूर्ण राहण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. रत्नागिरी जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ मध्ये निवडलेल्या ४७ गावांमधील सर्व १६१२ कामे पूर्ण झालेली आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जायकवाडी धरणाच्या कालव्यांची वहनक्षमता वाढविण्याबाबत

**(४) * ४१६१९ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७७६३ ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जायकवाडी धरणाच्या पैठण डाव्या कालव्याची संकल्पित वहन क्षमता ३६०० क्युसेक्स तर उजव्या कालव्याची संकल्पित वहन क्षमता २२५० क्युसेक्स असतानाही अनुक्रमे हे कालवे २००० व ९०० क्युसेक्स वहन क्षमतेने प्रत्यक्ष कार्यवाहीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कालव्याच्या वितरीका आणि चाऱ्यां, उपचाऱ्या नादुरुस्त असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत असून लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जायकवाडी धरणाच्या उजव्या कालव्याचे विशेष दुरुस्तीबाबत अंदाजपत्रके सादर करण्याची सुरु असलेली कार्यवाही व याबाबत शासनस्तरावरून होत असलेल्या नियोजनाचा तपशील काय आहे,
(४) तसेच, जायकवाडी धरणातील पाण्याच्या वापराचे योग्य नियोजन करून लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाण्याची हमी मिळण्यासाठी नदी पात्रातील बंधारे / बॅरेज वर्षातून दोन वेळा पाण्याने भरून घेवून शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची हमी देण्यासाठी शासन कोणते नियोजन करणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ सप्टेंबर, २०१७ व दिनांक २१ ऑक्टोबर, २०१७ रोजी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळ, औरंगाबाद यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

पैठण डाव्या कालव्याची संकल्पित वहनक्षमता ३६०० क्युसेक्स असून प्रत्यक्ष वहनक्षमता २२०० क्युसेक्स आहे व पैठण उजव्या कालव्याची संकल्पित वहनक्षमता २२५० क्युसेक्स असून प्रत्यक्ष वहनक्षमता ९०० क्युसेक्स आहे.

(२) अंशत: खरे आहे. तथापि, सन २०१७-१८ चे रब्बी व उन्हाळी हंगामात पैठण डावा कालवा व उजव्या कालव्यावर मागणीप्रमाणे सिंचन झालेले असून कोणीही सिंचनापासून वंचित राहल्याची तक्रार नाही.

(३) पैठण डावा कालव्याचे व उजव्या कालव्याचे विशेष दुरुस्तीचे काम केंद्र शासनाच्या ISBIG योजनेमध्ये समाविष्ट करण्यासाठी प्रस्तावित केले आहे.

(४) जायकवाडी प्रकल्पाचे सिंचनाचे नियोजन मा.जलसंपदा मंत्री यांचे अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीचे बैठकीमध्ये करण्यात येते. जायकवाडी प्रकल्पाचे प्रकल्प अहवालानुसार नदीपात्रातील बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडणेबाबत नियोजन नाही.

(५) सदरील प्रकरणी मा.श्री.अमरसिंह पंडीत, वि.प.स. यांचे दिनांक २६/०९/२०१७ च्या पत्रान्वये जायकवाडी धरणातील पाणी वापराचे धोरण ठरविणेबाबत व दिनांक २१/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये पैठण उजव्या कालव्याची वहनक्षमता वाढविणेबाबत पत्राव्दारे मागणी करण्यात आली आहे. मागणीच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत क्षेत्रियस्तरावर अभ्यास चालू आहे.

-----------------

## राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी
## राज्यात होणाऱ्या ग्रामसभा रद्द केल्याबाबत

**(५) * ४१३३६ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशिष्ट दिनी आयोजित करण्यात येत असलेल्या ग्रामसभांच्या तारखांत बदल करण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेला असून ग्रामविकासाचे महत्व अधोरेखित करणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर या जयंतीदिनी राज्यात वर्षानुवर्षे आयोजित करण्यात येत असलेल्या ग्रामसभा सदर निर्णयानुसार रद्द करण्यात आलेल्या असून आता २ ऑक्टोबर रोजी ग्रामसभा राज्यात होणार नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अखंडपणे लढा देणाऱ्या व खेडी स्वयंपूर्ण समृध्द करण्याचा संदेश देत खेडयांचा देश असलेल्या भारतातील ग्रामविकासाचे महत्व अधोरेखित करणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २ ऑक्टोबर या जयंतीदिनी त्यांची स्मृती कायम ठेवत त्यांना अभिवादन करणे चालू राहवे यासाठी या दिवशी राज्यात ग्रामसभांचे आयोजन पूर्ववत करण्याबाबत फेरविचार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) राष्ट्रीय व राज्याच्या महत्वाच्या तसेच फ्लॅगशिप योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरिता व ग्रामसभेच्या विषयसूचीतील विषयांवर सर्वकष चर्चा घडवून आणण्याकरिता ग्रामस्थांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग व त्यांचा चांगला प्रतिसाद मिळण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत

अधिनियमातील कलम ७ नुसार नियमितपणे विहित कालावधीमध्ये मे, ऑगस्ट, नोव्हेंबर या महिन्यामध्ये व दिनांक २६ जानेवारी यानुसार चार ग्रामसभांचे आयोजन करण्यात येईल असा निर्णय शासन क्रमांक व्हीपीएम २०१७/प्र.क्र.५१२/पंरा-३, दिनांक २७ एप्रिल, २०१८ अन्वये घेण्यात आला आहे.
(३) या शासन निर्णयान्वये दिनांक २६ जानेवारी वगळता इतर राष्ट्रीय वा राज्याच्यादृष्टीने महत्वाच्या दिनांकास ध्वजवंदन, सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर कार्यक्रम/उपक्रम किंवा महत्वाच्या दिनांकाचे औचित्य साधून शासनास काही संदेश/प्रबोधन दयावयाचे असल्यास अशा संदेशांचे वाचन व प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पेट्रोल व डिझेल दर वाढीबाबत

**(६) * ४१२८१ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४०५९८ ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मुंबईसह ठाणे, नागपूर, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर या मोठ्या शहरांमध्ये तसेच इतर शहरांमध्ये पेट्रोल व डिझेलच्या दरात मागील चार महिन्यात वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने पेट्रोल व डिझेलचे दर नियंत्रण मुक्त केल्याने तसेच पेट्रोल व डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी होत नसल्याने व आतंरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतीनुसार देशातील इंधनाचे दर ठरत असल्याने दिनांक १ एप्रिल, २०१८ पासून पेट्रोलचे दर रुपये ८१.५९ तर डिझेलचे दर रुपये ६८.७० प्रतिलिटर झाल्याचे व मुंबईत गेल्या वर्षभरात पेट्रोलची वाढ रुपये ९ ने तर डिझेल प्रतिलिटर रुपये ६८.७७ इतके झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सततच्या वाढणाऱ्या इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे राज्यातील जनतेला महागाईला सामोरे जावे लागत असल्याने सदरील इंधन दर वाढीला राज्यातील विविध ठिकाणी विरोध दर्शविला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात वाढत्या महागाई रोखण्यासाठी तसेच पेट्रोल व डिझेलच्या किंमती कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) पेट्रोल व डिझेलचा दर आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या किंमतीवर होणाऱ्या बदलावर अवलंबून असल्याने त्याच्या दरामध्ये गेल्या चार महिन्यामध्ये वाढ झालेली दिसते, राज्य शासनाने पेट्रोल व डिझेलच्या कर दरामध्ये गेल्या चार महिन्यात कोणताही बदल केलेला नाही.

(२) पेट्रोल व डिझेलचे दर हे क्रुड तेलाच्या किंमतीवर अवलंबून असल्यामुळे आंतरराष्ट्रीयस्तरावर क्रुड तेलाच्या किंमती खूप वाढल्यामुळे त्याचा परिणाम पेट्रोल व डिझेलच्या किंमतीवर झाला आहे.

पेट्रोल व डिझेलच्या किंमतीवर मुल्यवर्धित कराव्यतिरिक्त क्रूड ऑईलची किंमत व त्यावर लागणारा केंद्रीय अबकारी कराचाही परिणाम होतो. या सर्व घटकांपैकी क्रुड तेलाच्या किंमतींचा परिणाम सर्वाधिक होतो.

(३) इंधन दरवाढीमुळे राज्यात काही ठिकाणी विरोध दर्शविला गेल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) राज्य शासनाने या आधीच दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ पासून पेट्रोलवरील करदरामध्ये रुपये २ प्रतिलिटर व डिझेलवरील करदरामध्ये रुपये १ प्रतिलिटर घट केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(७) * ४१२५३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ३५५४८ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सक्करदरा, नागपूर येथील शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय प्रशासनाने २६० खाटांचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे सादर करुन तीन वर्षे उलटूनही याप्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी “युजी” व “पीजी” अभ्यासक्रमासाठी १८४ जागांना मंजूरी देण्यात आली असून अध्यापकांच्या पद भरतीची मान्यता न दिल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेत अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास व अध्यापकांच्या पद भरतीस मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू महाविद्यालय व रुग्णालयास तसेच अध्यापकांच्या पद भरतीस मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) शासकीय आयुर्वेदिक रुग्णालयाच्या १८० रुग्णशय्यामध्ये ७० रुग्णशय्यांची वाढ करुन एकूण २५० रुग्णशय्या मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला मात्र उपलब्ध रुग्णशय्यांची व रुग्णांची संख्या विचारात घेता रुग्णशय्या वाढविण्याचे तूर्त प्रयोजन नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे. संस्थेतील अध्यापकांच्या पदोन्नती कोटयातील मागासवर्गीय प्रवर्गाची ३ पदे वगळता अध्यापकीय संवर्गातील अन्य पद भरती थांबविण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पिडित महिलांच्या पुनर्वसन व आर्थिक सहाय्य यासाठी "मनोधैर्य" योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(८) * ४१२२७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बलात्कार, बालकांवरील लैगिंक अत्याचार, ॲसिडहल्ला आणि अनैतिक तस्करीतील पिडित महिलांच्या पुनर्वसनासाठी व त्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी "मनोधैर्य" योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विधी सेवा प्राधिकरणाकडे देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण समितीची स्थापना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समितीचे सदस्य कोण आहेत व त्यांच्या कार्यकक्षा काय आहेत, तसेच या समितीने किती जणांना मदत केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) व (३) नाही.

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण समितीची स्थापना महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण नियम १९९८ अन्वये करण्यात आलेली असून, या समितीवर विधी क्षेत्रातील पात्र व तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्यात येते. या समितीची कार्यकक्षा विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या तरतुदीनुसार विहित करण्यात आलेली आहे.

नवीन मनोधैर्य योजनेच्या दिनांक ३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयानुसार पिडितींना अर्थसहाय्य मंजूर करण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य सेवा प्राधिकरण यथास्थित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना देण्यात आलेले आहेत. ही एक Single Window System आहे. यानुसार जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांच्याकडून ९३ प्रकरणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण समितीकडे वर्ग करण्यात आलेली आहेत.

-----------------

## हाफकिन इन्स्टिट्युटमार्फत औषध खरेदीस होणाऱ्या विलंबाबाबत

**(९) * ४१४८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.चंद्रकांत रघुवंशी, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३९१९८ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वेगवेगळया पातळयांवर औषध वितरणाची प्रक्रिया राबवली जात असताना त्यात अनेक त्रुटी आढळून आल्याने सदरील प्रक्रिया मोडीत काढून हाफकीन इन्स्टिट्यूटला राज्यातील औषध खरेदीच्या निविदा काढण्याचे आदेश देत खरेदीसाठी निधी दिला मात्र अद्याप ही प्रक्रिया पूर्ण न

झाल्यामुळे मागील चार महिन्यांपासून राज्यात औषधांचा तुटवडा कायम असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे दिड लाख कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सेवा देणाऱ्या तसेच हाफकीन कंपनीकडून औषध खरेदीची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने रुग्णालयांना औषधे उपलब्ध झाली नसणे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयासह इतर अन्य आरोग्य केंद्रास औषधाचा तुटवडा निर्माण झाला असून घाटी प्रशासनास स्थानिक खरेदीला फक्त रुपये ५०००/- चे बंधन असल्याने दररोज १५०० रुग्णांना बाहेरुन औषधी खरेदी करावी लागत असल्याने अडचणीच्यावेळी किमान रुपये ५०,०००/- ची औषधी खरेदीला अधिकार देण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे काय, असल्यास कधी,

(४) असल्यास, नागपूरच्या प्रादेशिक मनोरूग्णालयात मनोरूग्णांवरील उपचारासाठी एकूण १० प्रकारची औषधे उपलब्ध असतात मात्र, सध्या केवळ एकाच प्रकारचे औषध उपलब्ध असून झोपेच्या गोळयांसहित नैराश्यावरील औषधे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, हाफकिन इन्स्टिट्यूटमार्फत औषध खरेदीस विलंब लागणार असल्यामुळे अन्य उपाययोजना करुन अतिशीघ्रतेने औषध पुरवठा करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषध उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

राज्यातील आरोग्य संस्थाकरीता औषधे व वैद्यकीय उपकरणे यांची खरेदी करण्यासाठी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ अंतर्गत खरेदी कक्ष स्थापन करण्यात आला असून सदर कक्ष दिनांक १५/०८/२०१७ पासून कार्यान्वित झाला आहे.

सदर कक्षामार्फत रुपये १४८.२५ कोटी इतक्या रकमेचे १३१ पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध बाबींच्या खरेदीसाठी ८६१ निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत व १८० निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शा.नि. दिनांक ०१/१२/२०१६ नुसार रुपये ५०००/- इतकी खरेदी, निविदा न मागविता करण्यात येते. सदर खरेदी त्या त्या आर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी अशी तरतूद आहे. औषधांची खरेदी वित्तीय नियमावलीतील तरतुदीनुसार करण्यात येत असून रुपये ५०,०००/- किंमतीच्या खरेदीचे अधिकार स्थानिकस्तरावर प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर सद्य:स्थितीत विचाराधीन नाही.

(४) हे खरे नाही.

प्रादेशिक रुग्णालय नागपूर येथे मनोविकारावरील औषधांचा मुबलक साठा उपलब्ध आहे. तसेच झोपेच्या गोळ्यासहित नैराश्यावरील औषधही उपलब्ध आहेत.

(५) व (६) स्थानिकस्तरावर आवश्यक औषधे खरेदी करण्याकरीता संचालनालय स्तरावरुन रुपये ८.२५ कोटी स्थानिक खरेदीसाठी व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत रुपये ४१.५९ कोटी असे एकूण रुपये ४९.८४ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच शासन पत्र दिनांक १९/०५/२०१८ अन्वये एकूण प्राप्त निधिच्या १० टक्के निधी स्थानिक पातळीवर आवश्यक औषधे तद्नुषंगीक उपभोग्य वस्तु खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## राज्यात बालमृत्यूचे प्रमाण रोखण्याबाबत

**(१०) * ४२१६७ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज**

**ऊर्फ बंटी पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयंत पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप, श्री.रविंद्र फाटक, श्री.प्रकाश गजभिये, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी व्हावे यासाठी भरीव प्रयत्न केला जात असतानाही राज्यात गेल्या १७ महिन्यात २४ हजार ७१८ बालमृत्यूंची नोंद झाल्याचे तसेच यामध्ये ० ते १ वयोगटातील १८ हजार ६९२ मुलांचा तर १ ते ५ वर्षे वयोगटातील ५ हजार ९२६ मुलांचा समावेश असल्याचे दिनांक २४ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्यात विशेषत: अमरावती जिल्ह्यातील नंदुरबार व मेळघाट तालुक्यात माहे सप्टेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ मध्ये ३१८ बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाल्याचे दिनांक ७ मे, २०१८ रोजी निदर्शनास आले असून तसेच रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यात १९६ बालके कुपोषित असल्याचे तसेच मुंबईमध्ये जन्मानंतरच्या पहिल्या काही तासात ४२४ बालकांचा तर राज्यभरात ३५०० बालकांचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी पाडयातील योजनांची अंमलबजावणी योग्यरित्या होत नसणे, तर आदिवासी पाडयात औषधेही उपलब्ध होत नसणे यामुळे राज्यातील आदिवासी पाडयांसह अन्य भागात असलेल्या कुपोषण समस्येबाबत मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी कशी केली, याबाबत सविस्तर तपशिल द्या, असे निर्देश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी राज्य शासनाला देणे, हे ही खरे आहे काय,

(४) राज्यातील बालकांचे आरोग्य व कुपोषणाशी संबंधित बाबी हाताळण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी या पदावर नियुक्ती करताना बीएएमएस व एमबीबीएस डॉक्टरांची निवड करावी असा आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी देऊन एक वर्षे उलटले तरी महिला व बालविकास विभागाने त्यांची

अंमलबजावणी केली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून बालविकास प्रकल्प अधिकारी नियुक्ती करण्याबाबत दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी मध्ये डॉक्टरांची नियुक्ती तातडीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) आदिवासी जिल्ह्यातील लहान बालके व गरोदर, स्तनदा मातांचे होणारे कुपोषण रोखण्यासाठी पोषण आहार व आरोग्यांच्या सोई उपलब्ध करुन देण्यासाठी एमबीबीएस अथवा बीएएमएस अर्हता असलेले वैद्यकीय अधिकारी प्रकल्प संचालक म्हणून नियुक्त करण्याच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशानुसार आतापर्यंत आदिवासी भागात कोणकोणत्या ठिकाणी उक्त अधिकारी नियुक्त केले आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी बालकांचे कुपोषण आणि बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

राज्याच्या एचएमआयएस अहवालानुसार माहे ऑक्टोबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१८ या १७ महिन्याच्या कालावधीत एकूण २६ हजार ६१९ बालकांच्या मृत्यूची नोंद आहे. यामध्ये ० ते १ वर्ष वयोगटातील २३ हजार ८६५ व १ ते ५ वर्ष वयोगटातील एकूण २७५४ बालकांचा समावेश आहे.

(२) हे खरे नाही.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात (धारणी व चिखलदरा तालुक्यात) माहे सप्टेंबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ या कालावधीत ० ते १ वर्ष वयोगटातील १०६ व १ ते ५ वर्ष वयोगटातील २७ बालक असे एकूण १३३ बालमृत्यू झाले आहेत. तसेच, नंदुरबार जिल्ह्यात याच कालावधीमध्ये ४६ बालमृत्यू झाल्याची नोंद आहे.

हे सर्व बालमृत्यू कुपोषणाने झाले नसून विविध कारणांमुळे झालेले आहे. यात कमी जन्म वजन, कमी दिवसाचे बाळ जन्माला येणे, जंतुसंसर्ग, श्वसनदाह, जन्मत: श्वसनास अडचण, कमी तापमान व जन्मजात व्यंग इत्यादि

राज्याच्या एचएमआयएस अहवालानुसार सन २०१७-१८ मध्ये २४ तासाच्या आत एकूण ३७७८ अर्भकांचा मृत्यू झाला तसेच मुंबई मध्ये ४८३ बालकांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

(३) राज्यातील १६ आदिवासी जिल्हयातील पाडे व इतर क्षेत्रात कार्यरत आरोग्य उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत औषधी पुरविण्यात येते. सद्य:स्थितीत आदिवासी जिल्हयांमध्ये अत्यावश्यक जीवनरक्षक व तातडीच्या औषधांचा साठा उपलब्ध आहे. तसेच आशांसाठी औषधसाठा पुरविण्यात आला असून आदिवासी जिल्हयात कार्यरत २८१ भरारी पथकांमार्फत गाव / पाडयांमध्ये तपासणी व उपचार देण्यात येतात.

(४) व (५) बाल विकास प्रकल्प अधिकारी या पदाकरीता बीएएमएस अथवा एमबीबीएस ही अर्हता निश्चित करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार या पदाकरीता सेवाप्रवेश नियमामध्ये पात्रता / अर्हता ठरविण्यासाठी घेण्यात आलेल्या बैठकीत नामनिर्देशनाने भरावयाच्या बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) गट ब या संवर्गातील पदांसाठीच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये एमबीबीएस मधील वैद्यकीय पदवीधारक अथवा BA (Nutrition), BA (Home Science), BSC (Biotechnology), BSC (Food Technology), BA (Child Psychology) BA (Clinical Psychology) केवळ पदवीधारक किंवा पदव्युत्तर पदवी अशी शैक्षणिक अर्हता सुधारित सेवा प्रवेश नियमात करावी अशा सूचना दिल्या. त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागाशी विचारविनिमय करुन सेवा प्रवेश नियमामध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) राज्यातील बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागामार्फत पुढील उपाययोजना करण्यात येतात :-

अ) विशेष नवजात काळजी कक्ष.

ब) नवजात स्थिरीकरण कक्ष.

क) पोषण पुनर्वसन केंद्र.

ड) बाल उपचार केंद्र

ई) जीवनसत्व ‘अ’ मोहिम

-----------------

## मालवणी एव्हरशाईन नगर, मालाड (मुंबई) येथील कांदळवन तोडल्याबाबत

**(११) * ४२०९६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवणी, एव्हरशाईन नगर, मालाड, मुंबई येथे भुमाफियाकडून खाडी व नाल्यालगत असलेले कांदळवन तोडून मोठ्या प्रमाणात झोपडया उभारुन सहा ते सात लाख रुपयांना विकण्यात येत असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंधेरी, वर्सोवा येथील चार बंगला, म्हाडा, कवठ्याखाडी, मिलतनगर येथे संमाजकंठकाकडून कांदळवनाची कत्तल करुन अनधिकृत झोपडया उभारण्यात आल्याचे दिनांक २५ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिका व संबंधित कार्यालयातील अधिकारी, भुमाफिया, झोपडपट्टी गुंड यांच्या संगनमताने सदर बेकायदेशीर झोपडया उभारण्यात येत असून पावसाळ्यात नाल्यालगत बांधण्यात आलेल्या उक्त झोपडयांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताला धोका असल्याचेही निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) मालाड येथील मालवणीमधील एव्हरशाईन नगरमध्ये भुमाफियाकडून खाडी व नाल्यालगत असलेले कांदळवन तोडून मोठ्या प्रमाणात झोपड्या उभारल्या जात असल्याबाबतचे वृत्त स्थानिक साप्ताहिक नागरिक वार्तामध्ये दिनांक ३०/४/२०१८ रोजी प्रसिद्ध झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३), (४) व (५) मौजे मालवणी, तालुका बोरीवली सर्व्हे क्र. २६३ न.भू.क्र. २८४१ मधील १४७.९१४१ हे.आर क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. सदर क्षेत्रावरील ९९ झोपड्या दिनांक १८ व १९ एप्रिल, २०१८ रोजी वन विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीत निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत मौजे मालवणी मधील वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र अतिक्रमण विरहित करण्यात आलेले आहे.

मौजे वर्सोवा, ता.अंधेरी येथील सर्व्हे क्र. १२० चे एकूण क्षेत्र ९५.७५६८ हे.आर असून त्यापैकी ६०.९७३८ हे.आर कांदळवन क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात आहे. सदर क्षेत्रावर अतिक्रमण झाल्याचे आढळून आलेले नाही.

मौजे वर्सोवा, ता.अंधेरी मधील चार बंगला, म्हाडा, मिलतनगर आणि कवठ्याखाडी येथील कांदळवन क्षेत्र हे अनुक्रमे सर्व्हे क्र. १२० व सर्व्हे क्र. ८३ मध्ये अतिक्रमण झाल्याबाबत तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने वन विभागामार्फत जागेची सविस्तर स्थळ पाहणी केली असता, सदरचे क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात नसल्याचे दिसून आले. त्याबाबत वन विभागामार्फत तहसिलदार, अंधेरी तसेच उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम यांना कळविण्यात आले आहे.

मौजे वळणई एव्हरशाईन नगर सर्व्हे क्र. ३०७/१४६ मधील कांदळवन क्षेत्र हे खाजगी क्षेत्र असून ते वन विभागाच्या ताब्यात नाही. सदर क्षेत्रावर कांदळवनाचा ऱ्हास झाल्यास पर्यावरण संरक्षण कायदयांतर्गत सक्षम प्राधिकरण म्हणून महसूल विभागाकडून कारवाई होणे अपेक्षित आहे.

महसूल विभागाच्या ताब्यात असलेल्या प्रश्नात नमूद कांदळवन क्षेत्रावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिकेस शासनामार्फत कळविण्यात आले आहे.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील अंगणवाडयांना पोषण आहाराकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(१२) * ४२५३७ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील अंगणवाडयातील मुलांना दिला जाणारा पोषण आहार दोन वर्षापासून शासनाने बंद केला असून जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून पोषण आहारासाठी तरतूद मिळत असताना त्यावरही शासनाने निर्बंध लादल्याने पोषण आहाराअभावी जिल्हयातील कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ होत असल्याचे दिनांक ५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाडीतील मुलांचे कुपोषण होऊ नये म्हणून जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाने सेस फंडातून पोषण आहारासाठी निधीची तरतूद केली होती. या निधीतून जिल्हयातील २१०० अंगणवाडयामधील मुलांना पोषण आहार दिला जात होता परंतु शासनाने हाफकिनकडे पोषण आहाराची जबाबदारी सोपविण्याचा निर्णय घेणे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोषण आहाराकरीता निधी उपलब्ध होत नसल्याने मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषदेच्या बैठकीत यांनी नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोषण आहाराकरीता निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना असून शासनस्तरावर या योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. जिल्हा परिषद सेस फंडाच्या योजना राबविण्याचे धोरण हे ग्रामविकास विभागाच्या दिनांक २४/०१/२०१४ च्या शासन निर्णयानुसार असून त्याबाबत महिला व बालविकास समिती व जिल्हा परिषद स्तरावर निर्णय घेण्यात येवून योजना राबविण्यात येते.

नागपूर जिल्हयात मागील दोन वर्षात कुपोषणाचे प्रमाणात घट झाली असल्याचे दिसून येते.

| वर्ष | एकूण वजन घेतलेली बालके | साधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके व टक्केवारी | तिव्र कमी वजनाची बालके व टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २०१६ | १३७४९३ | १२३२०४<br>८९.६१% | १२१०६<br>८.८०% | २१८३<br>१.५९ % |
| २०१७ | १३३७१६ | १२३५८५<br>९२.४२% | ८८११<br>६.५९% | १३२०<br>०.९९% |
| २०१८ | १३३६२८ | १२२९९९<br>९२.०५% | ९१११<br>६.८२% | १५१८<br>१.१४ % |

माहे मार्च, २०१६ च्या तुलनेत माहे मार्च, २०१८ मध्ये MUW बालकांची संख्या १.९८% घटलेली असून SUW बालकांची संख्या ०.४५% इतकी कमी झालेली आहे. त्यामुळे नागपूर जिल्ह्यात कुपोषणामध्ये वाढ झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१८ च्या शुध्दीपत्रकानुसार औषधे, तद्नुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींसाठीच हाफकिन बायोफार्मास्युटीकल्स कॉर्पो. लि. यांना मागणी करण्यात येते. मात्र यात पोषण आहाराचा समावेश नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत पोषण आहार या योजनेसाठी सन २०१८-१९ या वर्षाकरीता रुपये १६५४/- कोटीचा वार्षिक कार्यक्रम अंमलबजावणी आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आला असून यापैकी केंद्र शासनाने रुपये ११०१.१० कोटी मंजूर केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालकांमध्ये आढळणारी कुपोषणाची समस्या सोडविण्याबाबत

**(१३) * ४२१९२ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांमध्ये आढळणारी कुपोषणाची समस्या सोडविण्यासाठी जिजाऊ मदत चाईल्ड हेल्थ न्युट्रिशन मिशन (राजमाता जिजाऊ माता-बालक आरोग्य आणि पोषण अभियान) महिला व बालविकास विभाग आणि रिलायन्स फाऊंडेशनने एक सामंजस्य करार केल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने करारानुसार कार्यवाही व त्याचे फायदे कुपोषित बालकांपर्यंत पोहचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) रिलायन्स फाऊंडेशन यांचेसोबत सामंजस्य करार प्रथम दिनांक २४/११/२०१५ रोजी झाला व सुधारित करार दिनांक ६/२/२०१८ रोजी करण्यात आला. सदर सामंजस्य करारानुसार रिलायन्स फाऊंडेशनच्या मदतीने राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये अंगणवाडीस्तरावर अंगणवाडीच्या आवारात परसबाग सुरु करुन या परसबागांमध्ये तयार होणाऱ्या भाजीपाल्याचा समावेश बालकांना अंगणवाडीतून वितरीत करावयाच्या आहारामध्ये करण्यात आल्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यास मदत होईल. त्यानुसार रिलायन्स फाऊंडेशन यांच्या मदतीने ठाणे, पालघर, जळगांव, यवतमाळ, परभणी, पुणे, उस्मानाबाद, वर्धा हया जिल्ह्यात एकूण ७३७९ इतक्या

परसबागा सुरु करण्यात आल्या असून या परसबागांमधून तयार झालेल्या भाजीपाल्याचा लाभ अंगणवाडीतील १,०७,३५४ इतक्या लाभार्थ्यांना झाला असून त्याचे परिणामही चांगले दिसून येत आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैद्यकिय रुग्णालय, नागपूर येथे क्षयरोगग्रस्त महिलांसाठी असलेल्या कक्षाच्या दुरुस्तीबाबत

**(१४) * ४२४६३ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैद्यकिय रुग्णालय, नागपूर येथील क्षयरोगाच्या महिलांसाठी असलेला कक्ष गेल्या चार वर्षापासून दुरूस्तीच्या नावाखाली बंद असून या कक्षाच्या दुरूस्तीसाठी शासनाने रुपये ५२ लाखाचा निधी मंजुर केला असून अद्यापही बांधकामाला सुरूवात झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निधी मंजूर होऊनही हा निधी बांधकाम विभागाकडे वळता न झाल्याने निविदा काढण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वॉर्डच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदर वॉर्डच्या दुरुस्तीचे जवळपास ७० टक्के काम पूर्ण झालेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) वॉर्ड दुरुस्तीचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(१५) * ४१८८० श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या आठ तालुक्यातील आरोग्य कर्मचारी मागील चार महिन्यापासून वेतनापासून वंचित असल्याची बाब दिनांक १३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यास किती कालावधी लागणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

पालघर जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या आठ तालुक्यातील आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन मागील तीन महिन्यांपासून थकीत होते.

(२) व (३) सदर कर्मचाऱ्यांच्या फेब्रुवारी व मे महिन्याचे वेतनाचे देयक तांत्रिक कारणास्तव कोषागार कार्यालयाकडून मंजूर झाले नाही. मार्च व एप्रिलचे देयक विहित कालावधीत अदा करण्यात आले. तांत्रिक बाबींच्या पुर्तता केल्यानंतर कोषागार कार्यालयाकडून माहे फेब्रुवारी व मे, २०१८ ची वेतन देयक दिनांक २१/०६/२०१८ रोजी आहारीत करण्यात आले असून त्यानुसार वेतन अदा करण्यात येत आहे.

-----------------

## काटोल, उमरेड व भिवापूर (जि.नागपूर) येथील ग्रामीण रूग्णालयामधील ट्रामा केअर युनिट सुरू करण्याबाबत

**(१६) * ४२३७६ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नागपूर मंडळांतर्गत ६ जिल्हयांमध्ये १४ ट्रामा केअर युनिट मंजुर केले असून नागपूर जिल्ह्यातील काटोल, उमरेड व भिवापूर येथील एकही ट्रामा केअर युनिट अद्यापपर्यंत कार्यान्वित झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या १० वर्षा पासून नागपूर जिल्ह्यातील ट्रामा केअर युनिट कार्यान्वित न होण्याची कारणे कोणती,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ट्रामा केअर युनिट सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

नागपूर मंडळांतर्गत मंजूर १४ ट्रामा केअर युनिट पैकी ८ कार्यरत आहेत.

(२) व (३) ट्रामा केअर युनिट ग्रामीण रूग्णालय, काटोलच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून एकूण ९ पदांपैकी १ अस्थिव्यंगतज्ञ आणि दोन बंधपत्रित एमबीबीएस डॉक्टर नियुक्त करण्यात आले आहेत. उर्वरीत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर ट्रामा केअर युनिटसाठी ३५ प्रकारच्या वैद्यकीय उपकरणांची आवश्यकता असून त्यापैकी Power Bone Drilll, Pneumatic Tourniget, Semiautoanalyser, Patient Cots, Patient Stools ही उपकरणे व साहित्य प्राप्त झाले असून उर्वरीत उपकरणे व साधनसामुग्रीचा पुरवठा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

ट्रामा केअर युनिट, उमरेडच्या बांधकामासाठी रुपये ३२४.३९ लक्ष च्या आराखड्यास दिनांक ०४/१०/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

ट्रामा केअर युनिट, भिवापूर च्या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून सदर ट्रामा केअर युनिटकरीता पदनिर्मितीची आणि उपकरणे व साधन सामुग्री उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जलयुक्त शिवार योजनेची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१७) * ४२२७९ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अहमदनगर जिल्ह्यात तसेच अन्य ठिकाणी शासनाच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेची कामे निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात किती ठिकाणी जलशिवाराची कामे पूर्ण झाली आहेत व किती ठिकाणी कामे प्रलंबित आहेत, तसेच प्रलंबित असलेली जलशिवाराची कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रलंबित कामास निधी पुरविण्याबाबत व ती पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) राज्यात सन २०१५-१६ ते २०१७-१८ पर्यंत जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवडलेल्या १६५२१ गावातील ५,५५,१५७ कामांपैकी ५,१६,३५१ कामे पूर्ण झालेली असून ३८८०६ कामे प्रगतीपथावर आहेत. निधी अभावी कोणतीही कामे प्रलंबित नाहीत.

-----------------

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला स्थानिक स्वराज्य संस्थांकडून थकबाकी मिळण्याबाबत

**(१८) * ४२४६२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हा परिषदेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे २ कोटी ६३ लाख ४२ हजार ४८० रुपये पाणीपट्टी थकीत असून कारंजा नगरपरिषदेकडे १ कोटी ४१ लाख ६३ हजार २६३ रुपये आणि वाशिम नगरपरिषदेकडे २ कोटी ७६ लाख ४३ हजार ८४० रुपयांची रक्कम थकित असल्याची बाब माहे एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणीपट्टीची थकबाकी असल्याने प्राधिकरण धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला थकबाकी मिळण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे मागणीनुसार जिल्हा परिषद, वाशिमकडून थकित रकमेचे अंतीम करुन त्याचे प्रमाणपत्र महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे देण्यात आलेले आहे.

या संदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पाणीपट्टी व देखभाल दुरुस्तीचे थकीत देयके मुद्रांक शुल्क अनुदानातून प्राथम्याने अदा करणेबाबत शासनाने सर्व जिल्हा परिषदांना पत्राद्वारे निर्देशित केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खाजगी विनाअनुदानित वैद्यकिय आणि नर्सिंग महाविद्यालयांना एकसमान शुल्क आकारण्याबाबत

**(१९) * ४१७७६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनाकडून शुल्काद्वारे होणारी फसवणूक थांबविण्यासाठी शासनाच्या शुल्क नियंत्रण शुल्क समितीने यापुढे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी खाजगी महाविद्यालयांनी तसेच एनआरआय कोटयासाठी एकसमान शुल्क घ्यावे अशी सूचना केली असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी महाविद्यालयांना एकसमान शुल्क आकारण्याबाबत केलेल्या सूचनेला खाजगी विनाअनुदानित वैद्यकिय आणि नर्सिंग महाविद्यालयांनी तीव्र विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी महाविद्यालयांना एकसमान शुल्क आकारण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याअगोदर त्या कॉलेजच्या खर्चाचा आढावा घेऊन नंतरच शुल्क ठरवावे अशी मागणी खाजगी कॉलेज संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी कॉलेज व नर्सिंग कॉलेज यांनी एकसमान शुल्काबाबत विरोध दर्शविल्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदीनुसार शासन कोटा, संस्था स्तरावरील कोटा आणि अनिवासी भारतीय कोटा यांच्याकरिता स्वतंत्र शुल्क निश्चितीबाबत तरतूद नसल्यामुळे वेगवेगळी शुल्क निश्चिती करण्यात येत नसल्याची बाब शुल्क नियामक प्राधिकरणाने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या निदर्शनास आणली होती. त्यानुसार संचालनालयाद्वारे दिनांक १२/०३/२०१८ च्या पत्रान्वये सदर बाब सर्व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयांच्या अधिष्ठातांना अवगत करण्यात आली आहे.

(२) होय, हे खरे आहे. खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत महाविद्यालयांच्या व्यवस्थापनांच्या संघटनेद्वारे एकसमान शुल्क आकारणीला विरोध दर्शविण्यात आला होता.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शासन कोटयातील जागांवरील (५०%) प्रवेशासाठी निश्चित केलेल्या शुल्काच्या ४ पट व ५ पट शुल्क हे अनुक्रमे संस्थास्तरावरील कोटा (३५%) आणि अनिवासी भारतीय कोटा (१५%) यांच्याकरिता लागू करण्यास शुल्क नियामक प्राधिकरणाने सहमती दर्शविलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घारपी-उडेली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे ग्रामपंचायतीच्या जमिनीवर बेकायदा रबराची लागवड केल्याबाबत

**(२०) * ४१२३३ श्री.रविंद्र फाटक, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घारपी-उडेली (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे ग्रामपंचायतीच्या ११० एकर जमिनीवर केरळवासीयांनी बेकायदा कब्जा करुन रबराची लागवड केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६५० एकर जमीन ताब्यात असतांनाही घारपी उडेलीत केरळवासीयांनी १५०० एकर जमिनीवर रबराची लागवड केली असून ८५० एकर जमिनीवर अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सावंतवाडीचे प्रांताधिकारी तसेच तहसिलदार यांनी केरळवासीयांच्या प्लांटेशनची पाहणी केली असता बेकायदेशीर अतिक्रमणाची वस्तुस्थिती उघडकीस आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) ग्रामपंचायत, फुकेरी अंतर्गत घारपी व उडेली ही दोन महसूली गावे समाविष्ट असून या दोन्ही महसुली गावात ७/१२ उताऱ्यांनुसार ग्रामपंचायत घाराप या नावे ७/१२ वर एकूण ४०-४१-७५ हेक्टर एवढे क्षेत्र ग्रामपंचायतीकडे गुर चराणासाठी विहित करण्यात आले असल्याचे दिसून येते. या क्षेत्राच्या सर्वे क्रमांकांची अंदाजित नजर पहाणी केली असता त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झाडे, झुडपे व जंगल दिसून येत असून रबर लागवड केल्याचे दिसून येत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात स्वयंसेवी संस्थांना कायमस्वरुपी बालगृह नोंदणी प्रमाणपत्र देण्याबाबत

**(२१) * ४२०२२ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९०० स्वंयसेवी बालगृहांच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ लागू करीत तुटपुंज्या अनुदानात जाचक नियमांचे पालन करणे बंधनकारक केल्याने बालगृहचालकांत अस्वस्थता निर्माण झाल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नियमावलीतील कलमानुसार बालगृहांसाठी कर्मचारी आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून ५० मुलांसाठी ३० कर्मचारी व कलम ३१ (२) नुसार बालकांच्या निवासासाठी कर्मचाऱ्यांच्या वेतनाची व

सुमारे ८ हजार चौरस फूट जागेची इमारत बंधनकारक केली असून या इमारतीला लागणाऱ्या भाडयाचा कुठेच उल्लेख नाही तसेच भोजन अनुदानाची तरतूदही शासनाने केली नसल्यामुळे अनुदानाअभावी आर्थिक परिस्थितीचा सामना करणाऱ्या ९०० स्वंयसेवी बालगृहचालकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात स्वयंसेवी संस्थांची बालगृह बाल न्याय अधिनियम, २००६ च्या कलम २३ अन्वये कायमस्वरुपी (तहहयात) कालावधीसाठी नोंदणी प्रमाणपत्र घेऊन सुरु करण्यात आली असून उक्त अधिनियमान्वये १०० मुलांच्या बालगृहासाठी ५५०० चौरस फुट इमारत व ११ कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध शासनाने निश्चित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ नुसार ६० कर्मचारी, दर्पण पोर्टलवर संस्थेची अद्ययावत माहितीसह दिनांक २० मे, २०१८ पर्यंत ऑनलाईन नोंदणी प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याबाबत महिला व बालविकास विभागाने कळविले असून शासकीय बालगृहांना ऑफलाईन अर्ज भरण्याची सवलत देण्यात आली आहे. बालगृह नोंदणी प्रमाणपत्रासाठी अशाप्रकारे जाचक अटी आताच लादण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, सन २०१५ च्या अधिनियमातील निकषांची पूर्तता करण्यासाठी देण्यात आलेला कालावधी अतिशय कमी असल्यामुळे तसेच या निकषांची पूर्तता करणे जुन्या बालगृहांना कठीण असल्यामुळे कालावधी वाढवावा व निकषांचा फेरविचार करावा, अशी मागणी शासनाकडे प्राप्त झाली आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) नाही.

(३) बालगृहांसाठी महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २००२ अनुसार ५५०० चौ फुट जागा निश्चित करण्यात आली होती. तसेच शासन निर्णयाद्वारे ११ कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध निश्चित करण्यात आलेला होता.

(४) केंद्र शासनाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ माहे जानेवारी, २०१६ मध्ये कार्यान्वित केलेला असून या अधिनियमाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) आदर्श नियमावली २०१६ कार्यान्वित केलेली आहे. या नियमावलीमध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ५० बालकांसाठी ३१ कर्मचारी तसेच नोंदणी प्रमाणपत्रासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना क्र. २७ मध्ये नोंदणी प्रमाणपत्रासाठी सादर करावयाच्या अर्जामध्ये सदर बाबी नमूद केलेल्या आहेत. त्यानुसार शासनाने या आदर्श नियमावलीच्या आधारे राज्याकरीता नियमावली तयार केली आहे.

(५) होय.

(६) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ व त्यानुसार केंद्र शासनाच्या आदर्श नियमावलीच्या आधारे शासनाने सदर निकष निश्चित केल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उपळाई बुद्रुक (ता.माळा, जि.सोलापूर) येथील कदम वस्तीची अंगणवाडी माळरानावर भरत असल्याबाबत

**(२२) * ४१९६३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपळाई बुद्रुक (ता.माढा, जि.सोलापूर) येथील कदम वस्तीची अंगणवाडी मागील काही वर्षापासून माळरानावर उघड्यावर भरत असल्याची बाब दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा सुटींमी देवीच्या माळावर दोन पत्र्यांच्या मंदिरात भरत असून हा माळ जमिनीपासून उंचीवर असल्याने लहान चिमुकल्या विद्यार्थ्यांना ऊन, वारा, पाऊस अशा नैसर्गिक आपत्तीचा सामना करत शिक्षण घ्यावे लागत असून उघडयावरच पोषण आहार मिळत असल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त अंगणवाडीसाठी खोली उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) उपळाई ब्रद्रुक कदमवस्ती ही मिनी अंगणवाडी असून मिनी अंगणवाडीस शासनाच्या धोरणानुसार स्वतंत्र इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन दिला जात नाही. मिनी अंगणवाडी ही ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध असलेल्या जागेत भरविण्यात येते. उपळाई बु.गावचे ग्रामविकास अधिकारी यांना प्रकल्पस्तरावरुन ग्रामपंचायतीकडे मिनी अंगणवाडीसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडी सेविकांचे निवृत्ती वय ६५ करण्याच्या आदेशाबाबत

**(२३) * ४२६४६ श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंगणवाडी सेविकांचे निवृत्तीचे वय ६५ करण्याचा निर्णय मा.महिला व बालविकास मंत्री महोदयांनी दिनांक १९ मार्च, २०१८ रोजी घेतला मात्र याबाबत आदेश काढण्यासाठी शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंगणवाडी सेविकांचे वय ६५ करण्याचा शासन आदेश काढत नसल्यामुळे ६० वर्षे पुर्ण झालेल्या शेकडो अंगणवाडी सेविका निवृत्त होणार असल्याने राज्यातील शेकडो बालकांच्या पोषण आहाराचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंगणवाडी सेविकांच्या उक्त प्रश्नांबाबत तातडीने आदेश काढून अंगणवाडी सेविकांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अदयाप, उक्त प्रश्नांबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास त्यामागील कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची मानधनी पदावरील सेवानिवृत्तीचे वय, वयाची ६० वर्षे करण्याचा निर्णय दिनांक २३/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. याबाबत विधानमंडळात झालेल्या चर्चेला उत्तर देताना काही अटींच्या अधीन राहून सेविकेचे सेवानिवृत्तीचे वय, वयाची ६५ वर्षे करण्याबाबत सभागृहास आश्वासन मार्च, २०१८ च्या अधिवेशनात दिलेले होते. त्यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचाराधीन असून लवकरच याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येणार आहे. सदर निर्णय होईपर्यंत वयाची ६० वर्षे पुर्ण केलेल्या सेविकांना मानधनी सेवेतून तूर्त सेवानिवृत्त करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) मधील वर्णे आदिवासी वाडीतील गर्भवतीला रुग्णवाहिका न मिळाल्याने बाळाचा मृत्यू झाल्याबाबत

**(२४) * ४१४५९ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) मधील वर्णे आदिवासी वाडीतील गर्भवतीला दवाखान्यात नेण्यासाठी रुग्णवाहिका मिळाली नसल्याने तिचे बाळ वाटेतच दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास दगावले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीवर कोणती कारवाई केली व भविष्यात अशी घटना घडू नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. हे खरे आहे.

(२) दिनांक १८/०४/२०१८ रोजी वर्णे आदिवासी वाडीतील गर्भवती महिला पोटात दुखत असल्याने उपचारासाठी अंगणवाडी सेविकेसह दवाखान्यात जाण्यासाठी अंगणवाडी सेविकेने रूग्णवाहिकेसाठी १०८ टोल फ्री क्रमांकावर संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या पाड्याच्या परिसरात तिच्या मोबाईलला रेंज नसल्यामुळे संपर्क होऊ शकला नाही. सदर गर्भवती महिलेचा रस्त्यातच गर्भपात झाला. सदर प्रकरणी बालविकास प्रकल्प अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांच्या समितीने केलेल्या चौकशीत कोणीही दोषी आढळून आले नाही.

वर्णे ठाकूरवाडी मधील ग्रामस्थांना प्राथमिक आरोग्य केंद्र, रूग्णसेवा टोल फ्री क्र. १०२ व अत्यावश्यक रूग्णसेवा टोल फ्री क्र. १०८ विषयी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जीवन अमृत (ब्लड ऑन कॉल) ही योजना मुंबईत बंद असल्याबाबत

**(२५) * ४२३३६ श्री.प्रविण दरेकर, अॅड.अनिल परब, श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरजू रुग्णांना शासकीय शुल्कामध्ये इच्छित स्थळी रक्त उपलब्ध व्हावे या उद्देशाने दिनांक ६ जानेवारी, २०१४ पासून जीवन अमृतसेवा (बल्ड ऑन कॉल) योजना शासनाने सुरु करुन तासाभराच्या आत थेट रुग्णालयात रक्त पुरविण्याची सुविधा मिळावी म्हणून १०४ या क्रमांकाची टोल फ्री हेल्पलाईन सुरु करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जीवन अमृत (ब्लड ऑन कॉल) ही योजना मुंबईत बंद करण्यात आली असून ती बारगळण्याची कारणे काय आहेत, तसेच मुंबईत मुबलक प्रमाणात रक्तपेढया असतांनाही ही योजना सुरु न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, ४ वर्षाचा कालावधी होऊनही मुंबईतील आठ रक्त साठवण केंद्रापैकी एकही केंद्र उभारण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे दुप्पट किंमतीने म्हणजे १४५० रुपये या दराने खाजगी रक्त पेढ्यातून गरीब रुग्णांना रक्त खरेदी करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना तातडीने सुरु करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

मुंबईतील ८ रक्त साठवणूक केंद्रांपैकी ४ रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वित झालेली आहेत व उर्वरीत ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयाचे बांधकाम /नुतणीकरण चालू होते. त्यामुळे रक्त साठवणूक केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाहीत.

(४) हे खरे नाही.

जीवन अमृत सेवा ही योजना जननी रक्तपेढी (Mother blood bank) म्हणजे सर जे.जे.महानगर रक्तपेढी, भायखळा येथून राबविण्यात येत आहे व या योजनेंतर्गत गरजू रुग्णाना आवश्यक रक्त पुरवठा शासनाने निश्चित केलेल्या दराने म्हणजे रुपये ८५०/- प्रमाणे करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मधुमेह, हृदयरोग व कर्करोगाच्या औषधांवरील जीएसटी कर रद्द करण्याबाबत

**(२६) * ४१९८५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मधुमेह व उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांना नेहमी लागणाऱ्या औषधांवरील खर्चात या महिन्यापासून ३.४ टक्क्यांनी वाढ होणार असुन या वाढलेल्या (एमआरपी) वर वस्तू व सेवाकर (जीएसटी) लावून ५ टक्क्यापर्यंत वाढण्याची शक्यता असल्याचे दिनांक ४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने पेट्रोल पाठोपाठ मधुमेह, हृदयरोग व कर्करोगावरील रामबाण औषधांसह प्रभावी प्रतिजैविकांच्या किंमतीत ३.४ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला असुन त्याबाबतचे परिपत्रक (नॅशनल फार्मास्युटीकल प्राइजिंग ॲथोरेटीचे (एनपीपीए) सहसंचालकांनी प्रसिध्द केल्याने रुग्णांना किंमती बरोबरच जीएसटी भरावा लागणार असल्याने त्यांना जादा पैसे भरावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औषधांवरील जीएसटी कर रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) सदर विषय केंद्र शासनाच्या अखत्यारित येतो. केंद्र शासनाच्या औषध विभागांतर्गत नॅशनल फॉर्मास्यूटीकल प्राइजिंग ॲथोरेटी (एनपीपीए) यांनी दिनांक २ एप्रिल २०१८ मध्ये निर्गमित केलेल्या आदेशानुसार काही औषधावरील किंमतीची उच्चतम मर्यादा निश्चित केली आहे. सदर उच्चतम मर्यादा निश्चित करताना घाऊक किंमत निर्देशांकात (डब्ल्यू पी आय) होणाऱ्या वाढीनुसार ३.४३८१२ टक्के वाढीचा समावेश करण्यात आला आहे. सदर वाढीवर नियमानुसार जीएसटी लागणार आहे.

(३) सदर विषय केंद्र शासनाच्या अखत्यारित येत असल्याने राज्य शासनामार्फत कार्यवाही करता येत नाही. केंद्र शासन व सर्व राज्य शासन सर्वसंमतीने जीएसटी अंतर्गत वस्तुंवरील करांचे दर जीएसटी परिषदेमार्फत निश्चित केले जातात व जीएसटी परिषदेने ठरविलेल्या कराच्या दराचा अवलंब संपूर्ण देशामध्ये केला जातो.
(४) लागू नाही.

-----------------

## राज्यातील संगणक परिचालकांच्या मागण्यांबाबत व थकीत मानधन मिळण्याबाबत

**(२७) * ४२०७४ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्रामविकास विभागामार्फत ग्रामीण भागातील नागरिकांना गावातच सर्व सोयीसुविधा व विविध प्रकारचे दाखले ऑनलाईन मिळावेत यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र सुरू करण्यात आले असुन आपले सरकार सेवा केंद्रात कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांचे मानधन थकीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची केंद्र चालविण्यासाठी ग्रामपंचायत क्लस्टरनुसार केंद्र चालकांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाची माहे डिसेंबर, २०१५ मध्ये महा ऑनलाईन या कंपनीसोबत असलेले करार संपले असून त्यानंतर एएसएसके या कंपनीकडे कंत्राट देण्यात आले. नव्याने सुरू करण्यात आलेले आपले सरकार सेवा केंद्र या प्रकल्पात काम करण्यासाठी पूर्वीच्याच संगणक परिचालकांची नियुक्ती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील विशेषत: मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील संगणक परिचालक हे अल्प मानधनावर काम करीत असून काही परिचालकांचे माहे फेब्रुवारी, २०१७ पासून मानधन मिळालेले नसून ते राज्य शासनाचे सीएससीएसपीव्ही या कंपनीकडे थकीत असून २८ हजार ग्रामपंचायतींनी हस्तलिखित कामकाज बंद करुन सर्व ग्रामपंचायती पेपरलेस करण्यासाठी ग्रामविकास विभागानी दिनांक १ एप्रिल, २०१८ ही तारीख निश्चित केली असताना दिनांक २५ मे, २०१८ अखेर राज्यातील एकही ग्रामपंचायत पेपरलेस होऊ शकली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, थकीत मानधन मिळण्यासाठी व प्रलंबित मागण्या मान्य होण्यासाठी अनेक वेळा राज्यातील संगणक परिचालकांनी आंदोलन, मोर्चे काढूनही त्यांना न्याय मिळत नसल्यामुळे काम बंद आंदोलन सुरू करण्याचा त्यांनी निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील संगणक परिचालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत व थकीत मानधन मिळण्याबाबत तसेच पेपरलेस ग्रामपंचायत करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ज्या केंद्र चालकांनी त्यांच्या मोबदल्याचे देयक, संगणक प्रणालीवर पुष्टी केले आहे, त्यांना रक्कम अदा करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) ज्या केंद्र चालकांनी त्यांच्या मोबदल्याचे देयक, संगणक प्रणालीवर पुष्टी केले आहे, त्यांना रक्कम अदा करण्यात आली आहे.

तसेच ग्रामपंचायती पेपरलेस करण्याच्या अनुषंगाने येत असलेल्या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी दिनांक २०/४/२०१८ रोजी समिती गठीत करण्यात आली असून ग्रामपंचायत पेपरलेस करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) नाही.

(६) ज्या ग्रामपंचायतींनी जिल्हा परिषदेमार्फत सीएससी-एसपीव्हीकडे रक्कम जमा केली आहे आणि ज्या केंद्र चालकांनी त्यांच्या मोबदल्याच्या रकमेचे देयक संगणक प्रणालीवर पुष्टी केले आहे अशा केंद्र चालकांच्या मानधनाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

राज्यातील ग्रामपंचायती पेपरलेस करण्याकरीता येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी बोईसर ग्रामपंचायती अंतर्गत एक समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीने केलेल्या अहवालानुसार ई-ग्राम संगणक प्रणालीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यात येत आहेत.

-----------------

## पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत

**(२८) * ४१६८९ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८६३ ला दिनांक ६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नार-पार, औरंगा, अंबिका, दमणगंगा या पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबतच्या योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे प्रगतीपथावर असलेले काम पुर्ण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिमवाहिनी नद्यांचे पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली व सदर योजनेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरील कार्यवाही वन विभागाच्या परवानगीसह माहे मार्च, २०१८ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कार्यवाही अद्यापपावेतो न होण्याचे कारण काय आहे व ती केव्हापर्यंत होणे अपेक्षित आहे, यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे. नार पार, औरंगा, अंबिका, दमणगंगा या खोऱ्यातील पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्यासाठी प्रस्तावित असलेल्या धरणांच्या सर्वेक्षणाचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. अन्वेषणाच्या कामासाठी वनविभागाच्या परवानगीसाठी पाठपुरावा सुरु आहे.

(२), (३) व (४) सदर योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या कामास रुपये १३.५१ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ०६/०४/२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच अन्वेषणाच्या कामास वन विभागाची परवानगी प्राप्त करुन घेण्याकरीता पाठपुरावा सुरु असून अन्वेषणाचे काम माहे नोव्हेंबर, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम केंद्र शासन अंगीकृत वॉटर ॲण्ड पॉवर कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (WAPCOS) लि., नवी दिल्ली, यांचेमार्फत करून घेणे प्रस्तावित असून त्याबाबत वॉटर ॲण्ड पॉवर कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि., नवी दिल्ली व कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव याच्यांत सामंजस्य करारनामा करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) या ठिकाणी जंगलतोड व मानवनिर्मित आग लावण्याच्या घटनेत वाढ होत असल्याबाबत

**(२९) * ४१८५९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथे शासनाने शतकोटी वृक्ष लागवड योजनेंतर्गत चार लाख वृक्षांची लागवड करण्यात आली परंतु मानवनिर्मित आग लागणे, बेसुमार जंगलतोड तसेच अचानक वणवा लागत असल्याने राज्यातील वनसंपदा नष्ट होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जंगलतोड व आग लावण्याच्या घटना रोखण्यासाठी प्रत्येक गावात वनव्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या असून त्या निष्क्रिय ठरत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन व्यवस्थापन समित्यांचा आढावा घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी माजी पंचायत समिती सदस्य यांनी मा.वनमंत्र्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जंगलाचा ऱ्हास, आगीच्या घटना रोखण्यासाठी व रानमेव्यावर पोट भरणारी आदिवासी जमात स्थलांतरीत होऊ नये यासाठी नेमलेल्या वनव्यवस्थापन समित्यांकडून अधिक जनजागृती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) मुरबाड तालुक्यात ४ परिक्षेत्र अंतर्भुत आहेत. सन २०१६-१७ ते २०१७-२०१८ मध्ये एकूण ८२६८०० वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. परंतू मोठ्या प्रमाणात मानवनिर्मित आग व बेसुमार जंगलतोड झालेली नसून वनसंपदा नष्ट झाल्याची घटना माहे मे, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आली नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) जंगलाचा ऱ्हास रोखण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

१) वन कर्मचाऱ्यांमार्फत कायम गस्त ठेऊन वनसंरक्षण करण्यात येते.
२) आग प्रतिबंधक जाळरेषा प्रतिवर्षी घेण्यात येतात. तसेच अग्निप्रतिबंधक पथक परिक्षेत्रनिहाय रात्रंदिवस कायम गस्त करत असतात. तसेच परिक्षेत्रातील Fire Blowers चा वापर करुन आग विझविण्याचे कामे केली जातात.
३) आदिवासी जमात स्थलांतरीत होऊ नये यासाठी नेमलेल्या वनव्यस्थापन समित्यांकडून अधिक जनजागृती करण्यात येते. तसेच आदिवासींना उपजिवीकेसाठी वनविभागातर्फे उपलब्ध होणारी जंगलातील कामे त्यांना देण्यात येतात. मुरबाड तालुक्यामध्ये आजतागायत एकूण ६७५ गॅस वाटप करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील रिक्त पदांबाबत

**(३०) * ४२२२१ श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) झरी तालुक्यातील (जि.यवतमाळ) प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रातील वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ व वर्ग-३, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, महिला व पुरुष परिचर, सफाई कामगार, आरोग्य सहाय्यक, वाहन चालक आदी कर्मचाऱ्यांच्या एकूण ११९ पदांपैकी ३८ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त असलेली विविध संवर्गातील ३८ पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.
झरी तालुक्यातील ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्या अंतर्गत २० उपकेंद्रामध्ये आकृतिबंधानुसार एकूण ८५ पदे मंजूर असून त्यापैकी ४६ पदे भरली आहेत.
(२) व (३) वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त नाहीत. वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत सुरु आहे.

-----------------

## राज्यातील रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३१) * ४१५१८ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या चार महिन्यापासून औषधांचा तुटवडा जाणवू लागला असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विशेषत: औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील रुग्णालयामध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील रुग्णालयामधील औषधांच्या तुटवडयाबाबत शासनाने आढावा घेतला आहे काय, असल्यास, कोणत्या जिल्ह्यात औषधाची तीव्र टंचाई आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयांना आवश्यक त्या औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

शासकीय रुग्णालयांमध्ये ७ कोटी पॅरासिटॅमोल गोळया व पॅरासिटॅमोल सिरपच्या बॉटल १४ लाख ७२ हजार इतका साठा उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रत्येक महिन्याच्या दर सोमवारी राज्यातील सर्व आरोग्य संस्थाचा व्हीडीओकॉन्फरन्सव्दारे आढावा घेण्यात येतो.

(४) राज्यातील आरोग्य संस्थांकरीता औषधे व वैद्यकीय उपकरणे यांची खरेदी करण्यासाठी हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ अंतर्गत खरेदी कक्ष स्थापन करण्यात आला असून सदर कक्ष दिनांक १५/८/२०१७ पासून कार्यान्वित झाला आहे.

सदर कक्षामार्फत रु १४८.२५ कोटी इतक्या रकमेचे १३१ पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच विविध बाबींच्या खरेदीसाठी ८६१ निविदा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत व १८० निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच दिनांक १९/०५/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये प्राप्त निधीच्या १० टक्के निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सन २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(३२) * ४२५७३ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३८८०८ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन योजना लागू करण्यात आली आहे. तथापि पेन्शन धारकाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियास सदर पेन्शनचा लाभ देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेन्शनधारकाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबाचे हाल होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंशदायी पेन्शनचा त्यांच्या कुटुंबियांना लाभ देणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) तथापि, वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यास सर्वसाधारणपणे नियत वयोमान (५८ वर्षे / ६० वर्षे) पूर्ण झाल्यावर त्याच्या खाती जमा झालेल्या एकूण रकमेच्या ४०% रक्कम (निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण - PFRDA कडून नियंत्रित केल्या जाणाऱ्या जीवन विमा कंपनीकडून) वार्षिकी (Annuity) खरेदी करण्यासाठी गुंतविणे अनिवार्य आहे. संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास व कुटुंबियास या वार्षिकीमधून हयातभर निवृत्तीवेतन देण्याची व्यवस्था केलेली आहे.

सेवानिवृत्त झालेला शासकीय कर्मचारी मृत पावल्यास त्याला मिळणाऱ्या वार्षिकीवरील लाभ त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे आई-वडिल आणि त्याची / तिची पत्नी / पती यांना हयातभर देण्याची तरतूद निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाच्या शासन अधिसूचना दिनांक ११/०५/२०१५ मधील प्रकरण क्रमांक २ मधील अ.क्र.३ (ए)(i) मध्ये नमूद आहे.

-----------------

## ग्लोबल वार्मिंगच्या वाढत्या धोक्यामुळे हवामान संतुलनासाठी वन विभागामार्फत दरवर्षी वृक्ष लागवड करण्याबाबत

**(३३) * ४२१७५ श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१२८५ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लोबल वार्मिंगचा वाढता धोका पाहता हवामान संतुलन व्हावे याकरिता वन विभागामार्फत मोठ्या प्रमाणात दरवर्षी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला जातो, सर्व प्रशासकीय यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करून घेतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी वृक्ष लागवड व संगोपन करण्याकरीता मोठी आर्थिक तरतूद केली जाते परंतु लागवडीनंतर झालेल्या सर्वेक्षणात लागवडीपैकी १० टक्के झाडे जगत नाही व दरवर्षी लागवडीला तेच ते खड्डे दाखवून करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वृक्ष लागवड व संगोपन कार्यक्रम हा वन विभागामार्फत राबविला जातो परंतु हेच अधिकारी व कर्मचारी ठेकेदारांच्या संगनमताने शासनाच्या करोडो रुपयांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन वृक्ष लागवड व संगोपनाचा कार्यक्रम खाजगी कंपनीकडे देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) वन विभागातील वृक्ष लागवड व संगोपनाचे काम विभागीयरित्या तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत वन विभागाकडून राबविले जाते. मात्र यामधील काही कामे काही ठिकाणी आवश्यकतेनुसार लोकसहभागातून केली जातात. खाजगी कंपन्यांकडे वृक्ष लागवड व संगोपनाची कामे देण्याबाबतचे सध्या धोरण नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उंचगी प्रकल्पात पाणी साठविण्याबाबत तसेच प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(३४) * ४२४०२ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील उंचगी प्रकल्पात पाणी साठविण्याची घोषणा मा.पालकमंत्री यांनी करुनही सांडव्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली नसून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्नही मार्गी लागला नसल्याचे दिनांक १२ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९६ मध्ये तारओहोळवरील उचंगी नजीकच्या उक्त प्रकल्पास मंजुरी मिळाली असता आजरा तालुक्यातील १० आणि गडहिंग्लज तालुक्यातील ४ गावांना फायद्याचा ठरणाऱ्या प्रकल्पाच्या कामास दिनांक ३१ डिसेंबर, १९९९ रोजी सुरुवात झाली तद्‌नंतर हे काम मागील अनेक वर्षापासून रखडल्याने रुपये १५ कोटीचा प्रकल्प रुपये १०० कोटीवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पाचे काम पूर्ण करुन प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. प्रकल्पाची मंजूर प्रमा किंमत रुपये १५.११ कोटी असून प्रकल्पाची अद्यावत मंजूर सुप्रमा किंमत रुपये ५८.७३ कोटी आहे.

(३) पुनर्वसनाअभावि प्रकल्पग्रस्त प्रकल्पाचे कामास तीव्र विरोध करित असलेमुळे प्रकल्पाचे काम रखडले आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होणेमधील विलंबामुळे प्रकल्पाचे किंमतीत वाढ झाली असून, शासनाने दिनांक ०५/०२/२०१५ रोजी प्रकल्पाच्या रुपये ५८.७३ कोटी किंमतीच्या सुप्रमा प्रस्तावास मान्यता दिली आहे. त्यामुळे चौकशी करणेचा प्रश्न उद्भवत नाही. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आवश्यक १००.३० हे. पर्यायी जमीन क्षेत्रापैकी ९७.३२ हे. क्षेत्र संपादित करणेत आले असून ६४.९७ हे. क्षेत्राचे वाटप करणेत आले आहे. उर्वरित क्षेत्र संपादन व वाटपाची कार्यवाही महसूल विभागाकडून प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्हा रुग्णालयाच्या नर्सिंग स्कुलची क्षमता तपासणीबाबत

**(३५) * ४२५९४ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हा रुग्णालयाच्या नर्सिंग स्कुलची क्षमता तपासणीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून आवश्यक ती प्रमाणपत्र प्राप्त होऊन महाराष्ट्र नर्सिंग कौन्सीलची सुसाध्य तपासणी होऊन शासनाकडून अंतिम मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मान्यता मिळून दिनांक १० ऑगस्ट, २०१८ पासून शाळा सुरु करण्याबाबत तसेच नर्सिंग स्कुलकरीता आवश्यक साहित्य खरेदी प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील पदविकास्तरावरील आर.ए.एन.एम. व आर.जी.एन.एम. अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थांना मान्यता देणे/ विद्यार्थी प्रवेश क्षमतेत वाढ करणे याबाबत धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रस्तुत विषयी पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(३६) * ४१२५८ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शैक्षणिक वर्ष संपले असतांनाही विद्यार्थ्यांना अजून शिष्यवृत्ती मिळाली नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी ही योजना सुरू असतांनाही शैक्षणिक वर्ष संपून देखील विद्यार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा न होण्याची प्रमुख कारणे काय आहेत,

(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वेळेवर शिष्यवृत्ती प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील वन विभागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी हे जबाबदाऱ्या पार पाडत नसल्याबाबत

**(३७) * ४२०४७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील वन विभागात काम करणारे अधिकारी व कर्मचारी हे वनसंरक्षणासह वन्य प्राण्यांचे संरक्षण, प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, त्यांची तस्करी रोखणे, त्यांच्या हत्या रोखणे, या मुलभूत जबाबदाऱ्या पार पाडत नसल्याचे दिनांक ४ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वन विभागातील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे वन विभागाची माहितीही उपलब्ध होत नसल्याचे येथील नागरीकांची तक्रार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात नियुक्त महिला गाईड यांना कायमस्वरूपी रोजगार मिळण्याबाबत

**(३८) * ४२३५० श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात नियुक्त महिला गाईड यांना रोजगार मिळण्यामध्ये भेदभाव करण्यात येत असल्याची तक्रार पोलीस स्टेशन, रामनगर (जि.चंद्रपूर) येथे दाखल करण्याचे वृत्त दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रकाशित झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय संविधान अनुच्छेद १४ नुसार लिंगभेद करण्यास बंदी असतांना ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनाद्वारे लिंगभेद करण्यात येत असल्याने स्थानिक श्रमिक यल्गार या संस्थेद्वारा एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात नियुक्त महिला गाईड यांनी पगमार्क या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण पूर्ण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नियुक्त महिला गाईड यांना कायमस्वरूपी रोजगार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) श्रीमती शहनाज सुलेमान बेग यांनी पुरुष व महिला गाईड यांचे काम वाटपाच्या अनुषंगाने तक्रार पोलीस स्टेशन, दुर्गापूर, जिल्हा चंद्रपूर येथे दिनांक ०१/०१/२०१८ रोजी केली आहे.

(२) स्थानिक श्रमिक एल्गार या संस्थेद्वारा एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पुरुष व महिला गाईड यांना काम देण्याची कार्यवाही आदिवासी ग्रामविकास पर्यटक मार्गदर्शक व वन्यजीव वनसंरक्षक समिती मार्फत करण्यात येते.

सदरचे गाईड मध्ये “अ”, “ब” व “क” अशी वर्गवारी करण्यात आली आहे. “अ” गटामध्ये संस्थेचे आजीवन सभासद असून “ब” व “क” गटामध्ये त्यांचे जेष्ठतेप्रमाणे गाईड यांना समाविष्ठ करण्यात आले आहे.

सदर गाईड यांना “अ”, “ब” व “क” वर्गवारी प्रमाणे काम देण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३९) * ४२६७९ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण २०११ नुसार ५० हजार ३२ लाभार्थी नव्याने पात्र आहेत, ज्यांच्याकडे घरे बांधण्यांसाठी जागा उपलब्ध नाही त्यांना शासनाकडून अनुदान देण्यात येते परंतु सोलापूर जिल्हयातील जागा नसलेल्या १२ हजार लाभार्थ्यांपैकी केवळ ८ जणांना जागा खरेदी करण्यासाठी अनुदान देण्यात आल्याची बाब दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) सोलापूर जिल्हयात आर्थिक व जातीनिहाय सर्वेक्षण २०११ नुसार प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत एकूण ५०,०४६ लाभार्थी पात्र असून यापैकी ११९२८ एवढया लाभार्थ्यांना घरकुलासाठी जागा उपलब्ध नाही. सन २०१६-१७ मध्ये सोलापूर जिल्हयास पंडित दीनदयाल उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत ६०६ लाभार्थ्यांचे उद्दीष्ट देण्यात आले होते. यापैकी ९५ लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले असून याप्रस्तांवापैकी १५ परिपूर्ण प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली असून उर्वरित प्रस्तावांना मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) या तालुक्यातील बंद अवस्थेत असलेल्या रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(४०) * ४२५६० श्री.सुभाष झांबड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३८१ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) या तालुक्यातील शेती समृध्द करण्यासाठी व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी मागील २२ वर्षापासून बंद अवस्थेत असलेल्या रामकृष्ण गोदावरी उपसाजलसिंचन योजनेला माहे एप्रिल, २०१८ रोजी वा त्यादरम्यान मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना जलदगतीने पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

(२) श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना पुनश्च कार्यान्वित करणेसाठी शासन निर्णय क्र.बैठक-२०१७/(प्र.क्र.१९३/२०१७) सिं.व्य.(म), दिनांक २ मे, २०१८ अन्वये रुपये ५.७९ कोटी निधी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती बँक, औरंगाबाद यांना अनुदान म्हणून गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या उपलब्ध निधीतून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## श्री क्षेत्र धारगड (ता.चिखलदरा, जि.अमरावती) धार्मिक स्थळास मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४१) * ४१५३५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००८ पासून श्री क्षेत्र धारगड (ता.चिखलदरा, जि.अमरावती) ला ‘‘क’’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आला असून मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री क्षेत्र धारगडचा पर्यटन स्थळात समावेश करुन मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत श्री क्षेत्र धारगड यात्रा सेवा समिती, आकोट व धारगड यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व शिवभक्त दिनांक ६ व ७ ऑगस्ट, २०१८ रोजी व संपूर्ण श्रावण महिन्यात व महाशिवरात्रीच्या दिवशी श्री क्षेत्र धारगड येथे दर्शनासाठी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री क्षेत्र धारगडचा पर्यटन स्थळ म्हणून समावेश करुन मुलभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, खरे आहे.

श्रीक्षेत्र धारगड (ता.चिखलदरा, जि.अमरावती) या तीर्थक्षेत्रास दिनांक २४/१०/२००८ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत क-वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आलेला आहे. सदर धार्मिक स्थळाला मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संपूर्ण श्रावण महिन्यात शिवभक्त दर्शनासाठी येत असल्याचा उल्लेख श्रीक्षेत्र धारगड यात्रा सेवा समिती, आकोट व धारगड यांनी दिलेल्या निवेदनात आहे.

तसेच सदर ठिकाणी वर्षभरात अंदाजे १५ ते २० हजार भाविक भेट देतात.

(४) श्रीक्षेत्र धारगड या स्थळास “क” वर्ग पर्यटन स्थळाचा दर्जा दिनांक ०८/०१/२०१६ रोजी प्राप्त असला तरी पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक ३० जून, २०१६ मध्ये क-वर्ग तीर्थक्षेत्रांसाठी (मंदिर, मशीद, गुरुद्वारा इ, धार्मिक स्थळांसाठी) नगरविकास विभाग व ग्रामविकास विभागामार्फत स्वतंत्र तीर्थक्षेत्र विकास योजना कार्यान्वित असल्यामुळे पर्यटन विभागामार्फत प्रादेशिक पर्यटन विकास योजना व क-वर्ग पर्यटन स्थळ विकास योजनां तर्गत तीर्थक्षेत्रांसाठी / कोणत्याही धार्मिक स्थळांसाठी निधी मंजूर करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे. परंतु सन २०१७-१८ मध्ये क-वर्ग तिर्थक्षेत्र योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या निधीमधून सन २०१५-१६ मध्ये मंजूर कामांच्या दायीत्वावरच खर्च करण्यात आल्यामुळे सदर तीर्थक्षेत्राला मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. सन २०१७-१८ मध्ये कोणत्याही नवीन कामाला जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेकडून मंजुरी प्रदान करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि आरे कॉलनीतील बफर झोनमधील आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(४२) * ४१४८९ ॲड.अनिल परब, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरास लागून असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि आरे कॉलनीतील बफर झोनमधील सर्व आदिवासी पाड्यांचे आरे कॉलनीतील इतर जागेत पुनर्वसन करण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहणाऱ्या आदिवासीनाही एसआरए नुसार होणाऱ्या पुनर्विकासाला विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(४) तसेच, याप्रस्तावावर अद्याप निर्णयाची अंमलबजावणी केली नसल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे व किती कालावधीत अंमलबजावणी होणार आहे ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाडे यांच्या पुनर्वसनाच्या अनुषंगाने गठीत उच्चस्तरीय सशक्तता समितीच्या दिनांक १६/०३/२०१८ रोजीच्या बैठकीत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमक व आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन आरे दुग्ध वसाहतकडून संपादीत करण्यात आलेल्या मौजे मरोळ मरोशी येथील जमिनीवर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांचे पुनर्वसन महाराष्ट्र क्षेत्रविकास व गृहनिर्माण प्राधिकरणामार्फत करण्यात येणार आहे.

तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमकांचे पुनर्वसन मौजे मरोळ मरोशी येथील जमिनीवर करण्याकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण निविदा संबंधित कागदपत्रे तयार करण्यात येणार असून, सदरची निविदा प्रक्रिया महाराष्ट्र क्षेत्रविकास व गृहनिर्माण प्राधिकरण यांचेमार्फत राबविण्यात येणार आहे. त्यानुसार उक्त क्षेत्रात पुनर्वसनाकरीता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे.

-----------------

## तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथे राज्य कामगार विमा योजना रुग्णालय उभारण्याबाबत

**(४३) * ४२५४८ श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामध्ये हजारो कंपन्या सुरु असून साधारणतः ३ लाख कामगार काम करीत असून सदर कामगारांना आरोग्य सेवेसाठी कंपन्यांमार्फतराज्य कामगार विमा योजनेंतर्गत पगारातून रक्कम जमा करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय नसल्याने कामगारांना या योजनेचा लाभ घेता येत नाही तसेच, खाजगी रुग्णालयात एकाच ठिकाणी सर्व सोयी सुविधा उपलब्ध नसल्याने वेगवेगळ्या रुग्णालयामध्ये उपचार घ्यावे लागत असल्याने कामगारांना आर्थिक भार सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना रुग्णालय कधीपर्यंत उभारण्यात येईल त्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत तळोजा येथे राज्य कामगार विमा योजनेंतर्गत एकूण १,२८,९१६ नोंदणीकृत विमाधारक आहेत.

सदर विमाधारकांकडून वर्गणी ही राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडे थेट जमा होते.

(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत पनवेल तालुक्यात राज्य कामगार विमा योजना रुग्णालय नाही. तथापि, राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत या क्षेत्रातील विमारुग्णांना Secondary Medical care व Super specialty treatment करीता अनुक्रमे ५ व ६ खाजगी रुग्णालयाशी टाय-अप केले असून सदर रुग्णालयामार्फत विमा रुग्णांना विनाशुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

(३) सदर क्षेत्रात राज्य कामगार विमा रुग्णालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली व राज्य शासन यांच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयात औषधाचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(४४) * ४३२३२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, आरोग्य केंद्र या ठिकाणी सर्दी, ताप, पडसे आदी आजारांसाठी सुमारे ४५ कोटी गोळ्यांची आवश्यकता असून सध्या ३ कोटी गोळ्या शिल्लक असल्याने त्या १ महिना पुरतील, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गोळ्यांच्या कमतरतेमुळे रुग्णांना बाहेरून गोळ्या खरेदी कराव्या लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गोळ्या खरेदी करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

शासकीय रुग्णालयांमध्ये ७ कोटी पॅरासिटॅमोल गोळया व पॅरासिटॅमोल सिरपच्या बॉटल १४ लाख ७२ हजार इतका साठा उपलब्ध आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) पॅरासिटॅमोलच्या गोळया (३९.८० कोटी) करण्याचा प्रस्ताव हाफकीन महामंडळास पाठविण्यात आला असून त्यानुसार सदर खरेदीसाठी हाफकीन महामंडळामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहेत. तसेच दिनांक १९/०५/२०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये एकूण निधीच्या १० टक्के निधी स्थानिकस्तरावर खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

# रत्नागिरी जिल्हयात घरबांधणी व घरदुरुस्तीचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्याबाबत

**(४५) * ४३४३५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात घरबांधणी व घरदुरुस्तीचे ग्रामपंचायतीकडे असलेले अधिकार शासनाने काढून ते तहसिल पातळीवर दिल्यामुळे नागरिकांना आपल्या कामासाठी तहसिल कार्यालयात वारंवार जावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरबांधणी व घरदुरुस्तीचे अधिकार पुर्वीप्रमाणे पुन्हा ग्रामपंचायतींना देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३) दिनांक २९ डिसेंबर, २०१४ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार राज्यातील प्रादेशिक योजना असलेल्या प्रदेशातील गावाच्या गावठाणाबाहेरील क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा तहसिलदार या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिकाऱ्यांना असुन यात सुधारणा करण्याची आवश्यकता बद्दल तपासणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इंटर्नशिपच्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतन वाढविण्याबाबत

**(४६) * ४३५०९ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय महाविद्यालयांमधून वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर इंटर्नशिपच्या विद्यार्थ्यांना आठवडयाला ६० तास काम करुनही केवळ सहा हजार रुपये प्रति महिना विद्यावेतन दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तुटपुंजा विद्यावेतनावर निर्वाह करणे अशक्य असल्याने इंटर्नशिपच्या विद्यार्थ्यांनी विद्यावेतन वाढविण्यासाठी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्यभरात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इंटर्नशिपच्या विद्यार्थ्यांचे विद्यावेतन वाढविण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) इंटर्नशिप विद्यार्थ्यांचे विद्यावेतन वाढ करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४७) * ४१५०९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.परिणय फुके** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्य विभागांतर्गत १२९०५ आरोग्य संस्था असून अ ते ड गटात एकूण १६१८१ पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मे, २०१८ अखेरीस आरोग्य विभागातील ४०० तज्ञ वैद्यकिय अधिकारी निवृत्त होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१७ अखेरीस ६२७ विशेष तज्ञ डॉक्टरांपैकी ४६६ विशेष तज्ञ डॉक्टर सेवानिवृत्त होऊन सदर रिक्त पदे त्वरित भरली जातील असे आश्वासन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मानसिक आरोग्य संकल्पना राबविण्याचे ठरवले असून सदर आरोग्य विभागात मनोविकार तज्ञ नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णांना पुर्ण क्षमतेने आरोग्य सेवा मिळण्याकरिता विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

राज्याच्या आरोग्य विभागात गट-अ ते गट-ड मध्ये एकूण ५४४४७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३७८४९ इतकी पदे भरलेली असून १६५९८ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रुपये ६६०० व त्यावरील एकूण १३५ अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) मधील ८२ वैद्यकीय अधिकारी व राज्य कामगार विमा योजनेंतर्गत एकूण ९ अधिकारी असे एकूण २२६ अधिकारी मे, २०१८ अखेरीस ५८ वर्षे वय पूर्ण झाल्याने सेवानिवृत्त होत असल्याचे आरोग्य सेवा संचालनालयाकडून व राज्य कामगार विमा योजना कार्यालयाकडून कळविण्यात आले होते. तथापि, त्यांना सेवानिवृत्त न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) मधील (१) बालरोगतज्ञ, (२) बधिरिकरणशास्त्रज्ञ, (३) नेत्रशल्यचिकित्सक, (४) कान, नाक, घसा, (५) मनोविकृतीचिकित्सक या विशेषज्ञ संवर्गातील नामनिर्देशन कोटयातील रिक्त पदे भरण्यासाठी मागणी पत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच (१) स्त्रीरोगतज्ञ, (२) अस्थिव्यंगोपचारतज्ञ, (३) क्ष-किरणतज्ञ, (४) क्षयरोगचिकित्सक व (५) चर्मरोग, गुप्तरोग तज्ञ या

पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणी पत्र पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार शरिरविकृतीशास्त्रज्ञ पदावर ४ उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून कान, नाक, घसा व बधिरिकरणतज्ञ पदावर नियुक्तीसाठी शिफारशी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार सदर पदावर प्रचलित कार्यपध्दती अनुसरुन नियुक्त्या देण्याची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आरोग्य सेवा संचालनालयाकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रुपये ६६००) मध्ये ११ मनोविकारतज्ञ व (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रुपये ५४००) मध्ये एकूण ३४ मनोविकारतज्ञ कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील सहसंचालक, आरोग्य सेवा पदावर पदोन्नती देण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या त्रुटींची पुर्तता करुन प्रस्ताव फेर सादर करण्यात येत आहे. तसेच उपसंचालक पदावर पदोन्नतीसंबंधीचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला आहे. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० ग्रेड पे रुपये ६६००) मधील नामनिर्देशन कोट्यातील रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणी पत्र पाठविण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शरिरविकृतीशास्त्रज्ञ पदासाठी प्राप्त झालेल्या शिफारशीनुसार ४ उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात ५७ अधिकाऱ्यांना पदोन्नतीने नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली आहे. तथापि न्यायालयीन स्थगिती आहे. उर्वरित संवर्गातील पदोन्नतीचे प्रस्ताव संचालनालयाकडून मागविण्यात आले आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आरोग्य सेवा संचालनालयाकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात उर्दू शाळांसाठी स्वतंत्र शिक्षण विस्तार अधिकारी नेमण्याबाबत

**(४८) * ४१५९८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व जिल्ह्यातील जिल्हापरिषद प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागामध्ये उर्दू शाळांसाठी स्वतंत्र शिक्षण विस्तार अधिकारी नेमण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात बोगस पॅथॉलॉजी लॅब बंद करण्याबाबत

**(४९) * ४१४१० श्री.प्रसाद लाड, श्री.परिणय फुके, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी : तारांकित प्रश्न क्रमांक ४०४८७ ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकिय परिषदेने मान्यता प्राप्त पॅथॉलॉजीस्टची नियुक्ती न करता लॅब चालवून आरोग्य तपासण्या अहवाल स्वत: प्रमाणित करणे हा बोगस वैद्यकिय व्यवसाय असून मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे उल्लंघन करणारे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आरोग्य तपासण्या आणि चाचण्या करणाऱ्या पॅथॉलॉजी लॅबच्या संख्येची माहिती शासनाकडे नसल्याने बोगस लॅबधारकांचे प्रमाण वाढले असून पॅथॉलॉजीस्ट संघटनांकडून वारंवार मागणी केल्यानंतरही शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी परिक्षेत्रातील लॅब मोजणी करून शासनाला माहिती द्यावी असे पत्रक काढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पॅथॉलॉजी लॅबची माहिती संकलन व्हावे असे शासनाचे आदेश असतानाही महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी कार्यालयाने दखल घेतली नसल्याने अवैध लॅबमध्ये वाढ झाली असल्याने यातून रूग्णांना त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहिती अधिकारान्वये प्राप्त झालेल्या माहितीवरुन राज्यातील महानगरपालिका क्षेत्रांनी लॅबची संख्या १० हजाराच्या घरात असून यातही ३० टक्के वैध तर ७० टक्के अवैध लॅब आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बोगस पॅथॉलॉजी लॅब बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक १२/१२/२०१७ च्या निर्गमित केलेल्या आदेशात, पॅथॉलॉजी लॅब चालविण्यासंदर्भात आदेश दिलेले नसून, फक्त पॅथॉलॉजी मधली पदव्युत्तर पदवी धारण करणारा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी याची प्रतिस्वाक्षरी अहवालावर असणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

पॅथॉलॉजी संघटनेच्या मागणीनुसार शासनाने सर्व महानगरपालिका, जिल्हाधिकारी यांच्याकडून लॅबबाबत माहिति मागविली आहे. तथापि, बोगस लॅबची संख्या वाढली आहे, हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

अशी माहिति उपलब्ध नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती आणि नवीन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(५०) * ४१४२२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०२७ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यात सन २०१६-१७ मध्ये ५० प्राथमिक शाळांच्या ६७ वर्ग खोल्या व ४५ उच्च प्राथमिक शाळांच्या ९९ वर्ग खोल्यांची दुरुस्ती, ८३ शाळांसाठी आर.टी.ई. कायद्यान्वये १६० वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्याची गरज असून तालुक्यातील ३३१ पैकी ८० वर्ग खोल्या धोकादायक झाल्या असल्यामुळे त्यांचे बांधकाम करण्यासाठी रुपये २००/- कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यातील इतर तालुक्यात सुद्धा अशीच परिस्थिती असून शेकडो शाळांचे वर्ग धोकादायक झाले असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यातील शाळांना बांधकाम निधी मिळावा यासाठी खासदार, बीड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून शाळांचे सर्वेक्षण करणे आणि सी.एस.आर. अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड जिल्ह्यातील शाळांच्या इमारत दुरुस्ती, नवीन बांधकामे आदीसाठी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाच्या शाळा बांधकाम आराखड्यातून शासनाने किती निधी मंजूर केला आहे, या निधीतून किती शाळा इमारती पूर्ण झाल्या आहेत, तसेच सी.एस.आर. मधून किती निधी मिळाला व खासदार, बीड यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीने कोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

तथापि, धोकादायक शाळांच्या वर्ग खोल्यामध्ये विद्यार्थ्यांना बसविण्यात येत नसून शाळा वर्गासाठी पर्यायी जागेची व्यवस्था करण्यात आली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) जिल्हा वार्षिक योजना सन २०१८-१९ अंतर्गत प्राथमिक शाळांची विशेष दुरुस्तीकरिता रुपये ३००.०० लक्ष व माध्यमिक शाळा बांधकाम / दुरुस्ती करिता रुपये २४८.०० लक्ष निधी मंजूर आहे.

शाळा दुरुस्त करण्याबाबत जिल्हा परिषद शिक्षण समितीमार्फत नियोजन / निवडीची प्रक्रिया सुरु आहे.

सी.एस.आर. (Corporate Social Responsibility) अंतर्गत शाळांच्या दुरुस्तीसाठी रुपये २७४००/- एवढा निधी प्राप्त झालेला आहे. तसेच, खासदार निधीतून रुपये ११०.०० लक्ष निधी प्रस्तावित करण्यात करण्यात आला असून सदर कामाची शिफारस मा.खासदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केली आहे. त्यानुसार शाळा दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात प्रलंबित सिंचन प्रकल्प पुर्ण करण्याबाबत

**(५१) * ४१३३५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक ३११७२ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रलंबित असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे ८४ हजार कोटी रुपयांची आवश्यकता असून या पार्श्वभूमीवर सिंचनाची नवी कामे सुरु करु नयेत व निधी अन्य विभागांमध्ये वळवू नये असे निर्देश मा.राज्यपाल महोदयांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात रखडलेले विभागनिहाय किती प्रकल्प आहेत व त्यासाठी किती निधी लागणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय.

(२) सद्य:स्थितीत राज्यात ६४ मोठे, ७९ मध्यम व १९१ लघु असे एकूण ३३४ प्रकल्प बांधकामाधीन असून त्यांची १ एप्रिल, २०१८ रोजी कामासाठीची संभाव्य उर्वरीत किंमत सुमारे रुपये ८४,००० कोटी इतकी आहे. प्रकल्प व उर्वरीत किंमत याची विभागनिहाय विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

| वैधानिक विकास मंडळ निहाय विभाग | प्रकल्पांची संख्या | उर्वरीत किंमत (रुपये कोटी) |
|---|---|---|
| विदर्भ | १३४ | ३३,१२७ |
| मराठवाडा | ५७ | १३,८६३ |
| उर्वरीत महाराष्ट्र | १४३ | ३६,६८० |
| एकूण | ३३४ | ८३,६७० |

(३) मा.मुख्यमंत्री स्तरावर, मा.मंत्रीस्तरावर व प्रधान सचिव स्तरावर बांधकामाधीन प्रकल्पांचा नियमित आढावा घेण्यात येवून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर मेडिकलमध्ये कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारणीसाठी निधी देण्याबाबत

**(५२) * ४१२४९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१२ च्या हिवाळी अधिवेशनात नागपूर मेडिकलमध्ये कॅन्सर इन्स्टिट्यूट उभारणीची घोषणा केली असून बांधकामाला मंजूरी दिली असतांनाही निधी न मिळाल्याने इन्स्टिट्यूट उभारणी झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इन्स्टिट्यूटच्या बांधकामाकरिता निधी न देण्याची कारणे काय आहेत तसेच निधी कधीपर्यंत मिळणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गेल्या ५-६ वर्षापासून उक्त इस्टिट्यूटला निधी उपलब्ध न करुन देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

याविषयी बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील वेदांत इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस या संस्थेने विद्यार्थ्यांकडून अधिकच्या शैक्षणिक शुल्काची वसुली केल्याबाबत

**(५३) * ४२४५६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेदांता इन्स्टिट्युट ऑफ ॲकेडमिक एक्सलन्स प्रा.लि., मुंबई संचालित वेदांत इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस, मु.पो.सासवंद (ता.डहाणू, जि.पालघर) या संस्थेने एम.बी.बी.एस. सन २०१७-१८ या प्रथम बॅचच्या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क वसूल केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेदांता मेडिकल महाविद्यालय/कंपनी या एका विशिष्ट संस्थेला महाराष्ट्र खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियिमन) अधिनियम, २०१५ या अधिनियमातील कलम २ (थ) मधील खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था या व्याख्येतून वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदेशीरपणे अधिकच्या शुल्क वसुलीबाबत व वेदांता या विशिष्ट संस्थेला कायद्याच्या व्याख्येतून वगळण्याच्या निर्णयाबाबत वरिष्ठ

पातळीवरुन चौकशी करावी, अशा प्रकारची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) सदर वैद्यकीय महाविद्यालय हे कंपनी कायद्याखाली नोंदणी झालेल्या व भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या दिनांक १७/०१/२०१७ रोजीच्या अधिसूचनेनुसार पात्र असलेल्या कंपनीद्वारे सुरु करण्यात आले असून ते नफा कमविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले आहे. या महाविद्यालयास अभिमत विद्यापीठासाठी लागू असलेल्या शुल्काच्या अटी लागू राहतील असे शासन निर्णय दिनांक २०/०७/२०१७ मध्ये नमूद केले आहे. त्यामुळे सदर महाविद्यालय शुल्क नियामक प्राधिकरणाच्या कार्यकक्षेत येत नाही.

(२) होय, हे खरे आहे. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या विनियमनानुसार कंपनीद्वारे सुरु करण्यात आलेल्या महाविद्यालयांना नफा कमविण्यासंबंधी घातलेले निर्बंध काढण्यात आले असल्याने शासनाने सदर कंपनीद्वारे स्थापन वैद्यकीय महाविद्यालय हे महाराष्ट्र खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ या कायद्यातील कलम २(थ) मधील ‘खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्था’ या व्याख्येतून वगळले आहे.

(३) वरील निर्णयाच्या अनुषंगाने पुन्हा छाननी करण्याची आवश्यकता लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

(४) कंपनी कायदयांतर्गत स्थापन कंपनीद्वारे सुरु करण्यात आलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाने नफा कमविण्यासंबंधी असलेले निर्बंध केंद्र शासनाने काढून टाकल्यामुळे सदर महाविद्यालयासंबंधी वरीलप्रमाणे निर्णय हा शासनातर्फे घेण्यात आला आहे. तसेच, सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यात शासकीय रुग्णालयात खाटांची संख्या कमी असल्याबाबत

**(५४) * ४२१०० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील रुग्णालयात ४ हजार २६४ रुग्णांसाठी केवळ एकच खाट तर राज्यात एक लाख लोकांसाठी केवळ १०८ खाटा असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये त्यादरम्यान निदर्शनास आली असून जागतिक आरोग्य संघटनेच्या नियमानुसार साधारणतः एक हजार रुग्णांमागे एक खाट असावी, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्यासाठी भरीव तरतूद असतानाही ग्रामीण रुग्णालयात खाटांची कमतरता असल्याचे कारण काय आहे तसेच गरीब व मध्यमवर्गीय रुग्ण उपचार घेत असलेल्या शासकीय रुग्णालयात खाटांची संख्या वाढविण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यात प्रति २३०६ लोकसंख्येसाठी १ खाट शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध आहे.

(२) राज्यात ३० खाटांचे ३६५ ग्रामीण रूग्णालये कार्यरत असून एकूण १०५० खाटा उपलब्ध आहेत. सन २०१७-१८ च्या आकडेवारीनुसार सर्व ग्रामीण रूग्णांलयांमध्ये बेड ऑक्युपन्सी रेट विचारात घेऊन या रूग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत निर्णय घेण्यात येतो.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात महिला व बालविकास विभागातील अनुदान वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५५) * ४२५१७ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात महिला व बालविकास विभागाकडून चालविण्यात येणाऱ्या ९९ बालगृहांकरीता माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१७ साठी रुपये १ कोटी ७२ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाले असून सदरील अनुदान हे संस्थाचालकांचे मागणीचे परीपुर्ण प्रस्ताव नसतानाही एकाच दिवशी तीन विविध आदेशाने हा निधी ठराविक संस्थाना वितरीत करण्यात येऊन अशाप्रकारे अनुदान वाटपात सव्वा सहा कोटींचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ९ मे, २०१८ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यात ९९ बालगृहे असतानाही मोजक्याच संस्थांना लाखांवर आणि काहींना हजारोंवर रक्कम देण्यात आली होती व काही बालगृहांची मागणी नसतानाही तसेच काही बंद बालगृहांना ही निधी वितरीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामध्ये महिला व बालविकास अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नातलगांचा समावेश असून सदर अनुदानाचा अपहार त्यांच्या नातलगांनीच केला असल्याचे प्रकरण निदर्शनास आल्याने काही संस्थाकडून रुपये ३३ लाख परत विभागाच्या खात्यावर भरुन घेतले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामध्ये पुण्याच्या आयुक्तालयापासुन जिल्हा महिला व बालविकास विभागातील अधिकारी व कर्मचारी आणि काही संस्था चालकांच्या संगनमताने सदरहू गैरव्यवहार सुरु असल्याबाबतची तक्रार सामान्य बालगृह चालकांनी पुणे आयुक्तालयात दाखल केली असता त्यावर औरंगाबाद उपायुक्तांनी नेमलेल्या पाच सदस्यीय समितीने चौकशी केली असून अनुदान वितरणाचे कुठलेही कागदपत्रे समितीला दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस बालगृहे व संस्थाचालक, महिला व बालविकास अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, या संदर्भात बालविकास संस्थाचालक व कर्मचारी संघटना, लातूर यांनी आयुक्तालयास दिलेल्या दिनांक २३ एप्रिल, २०१८ च्या निवेदनामध्ये सदर बाब नमूद करण्यात आलेली आहे.

(२) व (३) तपासणी पथकाने सादर केलेल्या अहवालानुसार २ बंद संस्थांना अनुदान वितरीत करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच काही संस्थांना अनुदानाची रक्कम अतिप्रदान केल्याचे आढळून आल्याने अतिप्रदान अनुदानाची रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

(४) अंशत: खरे आहे. विभागीय उपआयुक्त, महिला व बालविकास औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, बीड यांनी त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांपैकी काही कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

(५) सदर प्रकरणी आयुक्तालय पुणे यांच्यास्तरावरुन पथक तयार करण्यात येवून त्यांचेमार्फत तपासणी करण्यात आलेली आहे. सदर तपासणीचे अंतरिम अहवालानुसार आढळून आलेल्या गंभीर त्रुटींबाबत संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

----------------

## राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात (ईएसआय) औषधांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(५६) * ४२१९३ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात (ईएसआय) औषधांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे गरीब रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य कामगार विमा योजना रुग्णालयात बाहयरुग्ण विभागात दररोज ३५० रुग्ण उपचारासाठी येत असुन गेल्या काही दिवसांपासून अनेक रुग्णांना औषधे नसल्याचे लिहून देऊन बाहेरुन औषधे खरेदी करण्यास सांगितले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

राज्य कामगार विमा योजनेच्या सर्व रुग्णालयात मिळून सरासरी १७०५ व्यक्ती दरदिवशी बाहयरुग्ण उपचार घेतात.

औषध खरेदीच्या प्रक्रियेमध्ये सद्या धोरणात्मक बदल करण्यात आला असून सर्व शासकीय रुग्णालयांनी हाफकीन बायोफार्मास्युटीकल्स कॉपोरेशन मार्फत औषधे खरेदी करण्याचे आदेश शासनाने दि. २६.०७.२०१७ रोजी दिले आहेत. त्यानुसार हाफकीन संस्थेकडे दि.०५.०४.२०१८ च्या पत्राने आवश्यक औषधांचा पुरवठा करण्यासाठी मागणी नोंदविण्यात आली असून सदर संस्थेकडून त्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. दरम्यानच्या काळात औषध खरेदीसाठी प्राप्त झालेल्या १० टक्के राखीव निधीमधून स्थानिक खरेदी करून औषधे उपलब्ध करून घेण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंदिवली (ता.वाडा, जि.पालघर) गावात गॅस्टोच्या साथीने महिलेचा झालेला मृत्यू

**(५७) * ४१८८५ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील चेंदिवली गावात ३५ जणांना गॅस्ट्रोची लागण होवून एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने साथ आटोक्यात आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे,

दिनांक ३ ते ५ मे, २०१८ या कालावधीत चेंदिवली गावात १९ जणांना गॅस्ट्रोची लागण झाली. या दरम्यान गावात झालेला एका महिलेचा मृत्यू हा हृदयरोगामुळे झाला आहे.

(२) जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांची उद्रेक ग्रस्त गावास भेट देऊन साथीची पहाणी केली, गावातील पेयजलाचा स्त्रोत असलेली विहिर सभोवती झालेल्या दलदलीमुळे तसेच गुरांच्या शेण व मुत्रामुळे दूषित झाल्याने सदर उद्रेक उद्‌भवला या उद्रेकाच्या नियंत्रणासाठी खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- घरोघरी जाऊन रुग्ण सर्वेक्षण व मेडिक्लोर वाटप.
- पाणी शुध्दीकरण व गुणवत्ता नियंत्रण.
- योग्य क्षमतेच्या टीसीएल पावडराचा साठा.
- उद्रेकग्रस्त गावात विविक्षीत कक्षाची स्थापना व रुग्णोपचार.
- रुग्णांच्या सहवासितांना प्रतिबंधात्मक उपचार.
- जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांच्या भेटी, उद्रेक पाहणी व मार्गदर्शन.
- जनतेचे आरोग्य शिक्षण व परिसर स्वच्छता

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेमधील कर्मचारी विना परवानगी विदेश दौऱ्यावर गेल्याबाबत

**(५८) * ४२३८० श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेमधील २२ कर्मचारी विना परवानगी कोलकता व बँकॉक येथे विदेश दौऱ्यावर गेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी स्थापन केलेल्या समितीने चौकशी पूर्ण करून माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान आपला अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांचेकडे सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अहवालामध्ये थोडक्यात काय आहे व या चौकशी अहवालानुसार शासनाने दोषींविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय, चौकशी अहवालानुसार विदेश दौऱ्यावर गेलेल्या २० कर्मचाऱ्यांपैकी १० कर्मचाऱ्यांनी मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह अर्जित रजा मंजूर करून घेतली होती व इतर १० कर्मचाऱ्यांनी विदेशात जाण्याची पूर्व परवानगी घेतलेली नसल्यामुळे त्यांना दिनांक १८/५/२०१८ ला सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

त्या १० निलंबित कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई चे नागपूर खंडपीठात रिट याचिका दाखल केलेली असून मा.न्यायालयाने जिल्हा परिषदेच्या दिनांक १८/०५/२०१८ च्या आदेशास अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे काम करणाऱ्या अकुशल कामगारांच्या मजुरीत वाढ करण्याबाबत

**(५९) * ४२२९० डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे काम करणाऱ्या अकुशल कामगारांच्या मजुरीत शासनाने केवळ रुपये २ ची वाढ केली असल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजना समितीने सन २०१४-१५ मध्ये मजुरांना किमान रुपये ३०० मजुरी मिळावी अशी शिफारस केल्यानंतरही शासनाने या शिफारशीकडे दुर्लक्ष केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तुटपुंज्या मजुरीमुळे रोहयोच्या कामांकडे मजुरांनी काम करण्यास विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रोहयोतील अकुशल कामगारांना कमी मजुरी देणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करुन कामगारांना रुपये ३००/- एवढी मजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मग्रारोहयो अंतर्गत मजूरांच्या मजूरीचा दर हा दरवर्षी केंद्र शासनाकडून निश्चित केला जातो. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी सन २०१८-१९ करिता रुपये २०३/- इतका मजूरी दर निश्चित केलेला आहे.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासंदर्भातील कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(६०) * ४१७८१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात दर हजारी ९०४ इतकी मुलींची संख्या असल्याचा नीती आयोगाच्या अहवालानुसार माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कमी होणारी मुलींची संख्या ही चिंताजनक असून स्त्री-भ्रुणहत्या रोखण्यासाठी प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील ४१६ संशयित सोनोग्राफी केंद्रावर नजर ठेवली जात असल्याची माहिती मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नीती आयोगाने जाहीर केलेल्या अहवालानुसार देशातील प्रमुख २१ राज्यांपैकी १७ राज्यांमध्ये मुलींच्या जन्म प्रमाणात घट झाली असून यामध्ये महाराष्ट्र पाचव्या स्थानावर आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी व यासंदर्भातील कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली तसेच दोषी सोनोग्राफी केंद्रावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

नीती आयोगाकडून माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये प्रकाशित अहवालानुसार १००० मुलांच्या जन्माच्या मागे मुलींच्या जन्माचे प्रमाण सन २०१२-१४ या कालावधीमध्ये ८९६ आणि सन २०१३-१५ या कालाधीमध्ये ८७८ एवढे आहे. नागरी नोंदणी अहवालानुसार सन २०१६ मध्ये मुलींचे जन्म प्रमाण ९०४ झाले आहे.

(२) पीसीपीएनडीटी कायद्याचे अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व सर्वसामान्य व्यक्तीच्या तक्रारीची तात्काळ दखल घेण्यासाठी दिनांक ११ जुलै, २०११ रोजी टोल फ्री हेल्पलाईन १८००-२३३-४४७५ हेल्पलाईन व www.amchimulgi.gov.in वेबसाईट सुरु करण्यात आली. संपुर्ण राज्यात हेल्पलाईनवर व संकेतस्थळावर प्राप्त तक्रारीच्या आधारावर ४१६ केंद्रे संशयीत (Suspicious) आढळून आले आहेत.

(३) हे खरे आहे.

नीती आयोगाने जाहिर केलेल्या अहवालात सन २०१२-१४ या कालखंडाच्या तुलनेत सन २०१३-१५ मधील जन्मदराची तुलना करण्यात आली आहे. मुलीच्या जन्मदरात घट होणारी इतर राज्य गुजरात (५३),

हरयाणा (३५), राजस्थान (३२), उत्तराखंड (२७), महाराष्ट्र (१८) अंक अशी दर्शविली आहेत. महाराष्ट्र राज्य पाचव्या स्थानावर आहे.
(४) राज्यात स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी समुचित प्राधिकारी यांचेमार्फत सोनोग्राफी केंद्राची नियमित त्रैमासिक तपासणी करण्यात येते या कायद्याचे उल्लघंन करणाऱ्या दोषी सोनोग्राफी केंद्रांवर कायेदशीर कारवाई करण्यात येते.

राज्यात मुलींच्या जन्माचे महत्व पटवून देण्यासाठी व्यापक जनजागृतीसाठी टी.व्ही. स्पॉटव्दारे प्रसारण, प्रसवपूर्व गर्भलिंग निदान कायद्यामधील तरतूदी इत्यादी विषयीची माहिती देणाऱ्या रेडिओ जिंगलचे आकाशवाणी मुंबई व पुणे केंद्रावरुन प्रसारण, आरोग्य पत्रिकेच्या मासिक अंकात आंतरराष्ट्रीय बालक दिन या विषयावर लेख इ. कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील समुचित प्राधिकाऱ्याकडून पीसीपीएनडीटी कायद्यांच्या तरतुदीचा भंग करणाऱ्याविरुध्द मे, २०१८ अखेर ५८५ कोर्ट केसेस दाखल करण्यात आल्या आहेत. यापैकी अंतिम केलेल्या ३५० प्रकरणांपैकी एकूण ९९ प्रकरणांमध्ये ११३ जणांना शिक्षा झालेली आहे. त्यापैकी ८२ जणांना सश्रम कारावासाची शिक्षा व १७ प्रकरणांमध्ये दंड ठोठावला आहे व २०७ वैद्यकीय व्यवसायीकांची नावे महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेला कळविली आहेत, त्यानुसार ७२ डॉक्टरांची सनद निलंबित करण्यात आली आहे. तर ५८ डॉक्टरांना ताकीद देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील (ता.कर्जत, जि.अहमदनगर) शिक्षकाने विद्यार्थ्याच्या तोंडात लाकडी छडी घातल्याबाबत

**(६१) * ४१२४६ श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील (ता.कर्जत, जि.अहमदनगर) चंद्रकांत सोपान शिंदे या शिक्षकाने गणित चुकले या कारणावरुन ८ वर्षाचा विद्यार्थी रोहन दत्तात्रय जंजिरे याच्या तोंडात लाकडी छडी घातल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छडी तोंडात घातल्यामुळे रोहनच्या अन्ननलिका व श्वसन नलिकेस गंभीर इजा झाल्याने पुणे येथील खाजगी (रुबी) रूग्णालयात दाखल करून तेथे त्याच्यावर ४ शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून तो प्राणाशी झुंज देत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळेत अन्य ५ विद्यार्थ्यांच्या तोंडातही शिक्षक चंद्रकांत शिंदे यांने छडी खुपसल्याने त्यांच्या पालकांनी कर्जत येथील गट शिक्षणाधिकारी अनिल शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी शिक्षकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच रोहनच्या उपचारार्थ शासनस्तरावरुन आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर विद्यार्थ्यावर शस्त्रक्रिया झाली असून, त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली असल्याने हॉस्पिटलमधून घरी सोडण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधित शिक्षकास दिनांक ११/०४/२०१८ रोजी तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. सदर विदयार्थी रोहन याच्या उपचारास शासनस्तरावरुन मदत देण्यात आलेली नाही. मात्र सदर विदयार्थ्याच्या वडीलांना कर्जत तालुक्यातील शिक्षकांनी रुपये १,४६,०००/- ची मदत केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सुविधांनी सज्ज स्मार्ट अंगणवाडया तयार करण्याबाबत

**(६२) * ४२२६२ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सौर ऊर्जेवर चालणारी विद्युत यंत्रणा, ई लर्निंगची सुविधा, एलईडी टीव्ही, युएसबी पोर्टल, मुलांसाठी खुर्ची आणि टेबल, जलशुध्दीकरण यंत्र, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा अशी अद्ययावत उपकरणे आणि सुविधांनी सज्ज असलेल्या स्मार्ट अंगणवाडया तयार करण्याची घोषणा शासनाने केली असून याकरिता निधीच मिळालेला नसल्याचे दिनांक ३० मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक बालविकास योजना ही महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून राबविली जाते या योजनेतून अंगणवाडीतील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांचा भौतिक, शारिरीक आणि सर्वांगिण विकासासाठी निधीच मिळाला नसल्याने या अंगणवाडयामध्ये शिक्षण घेत असलेल्या बालकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

अंगणवाडीतील ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना खेळ शैक्षणिक साहित्य पुरवठा करण्याकरिता सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात निधी प्राप्त झालेला होता. या तरतूदीमधून अंगणवाडीतील ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना खेळ शैक्षणिक साहित्य पुरवठा करण्यात येत आहे. तसेच जिल्हा परिषद स्तरावर जिल्हा परिषदेच्या निधीतून अंगणवाडीतील बालकांना खेळ शैक्षणिक साहित्य याचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील उपजिल्हा रूग्णालयात रूग्णांना आवश्यक ती सेवा देण्याबाबत

**(६३) * ४१८३४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यामध्ये (जि.रायगड) गरीब गरजू रूग्णांना आरोग्य सेवा मिळावी म्हणून शासनाने उपजिल्हा रूग्णालय बांधले असून तेथे रूग्णांना आवश्यक ती सेवा मिळत नसल्याने रूग्णाची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रूग्णालयातील रिक्त पदे व औषधांच्या कमतरतेमुळे अधिकारी/कर्मचारी रुग्णांना वाईट वागणूक देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रूग्णालय ५० खाटांचे असून रूग्णालयात थंडी-ताप आणि किरकोळ आजार या आजारांवरील उपचारांव्यतिरिक्त कोणताच उपचार करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर उपजिल्हा रूग्णालय सुसज्ज व रूग्णांना वेळेवर उपचार मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

रुग्णालयात एकूण मंजुर पदे ४७ आहेत. त्यामधील एकूण ४२ पदे भरलेली आहेत. वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांच्या ९ पदापैकी ७ पदे भरलेली आहेत.

उप जिल्हा रुग्णालय कर्जत, जि.रायगड येथे पुरेशा प्रमाणात औषधाचा साठा उपलब्ध आहे.

रुग्णालयामधील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची तपासणी करुन योग्य तो औषधोपचार करण्यात येतो.

सन २०१७-१८ मध्ये बाह्यरुग्ण-७६९०९, आंतररुग्ण ४३९६, प्रसुती-३९६, लहान शस्त्रकिया-४८९, मोठ्या शस्त्रकिया-७६, न्याय वैद्यक रुग्ण-११०६, शवविच्छेदन-८७, श्वानदंश-१०५०, सर्पदंश-१६३, विंचूदंश-३४५, क्ष-किरण चाचण्या-८६० व प्रयोगशाळा चाचण्या-३५७९८ यास्वरुपाच्या उपचारात्मक सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(६४) * ४१६८८ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७८६० ला दिनांक १३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात विशेषज्ञ गट-अ, मुख्य प्रशासकीय अधिकारी-१ पद, प्रशासकीय अधिकारी-१ पद, अधिसेविका तसेच वर्ग-३ ची ३२ पदे तर वर्ग-४ ची ७४ रिक्त पदे भरण्याची शासनस्तरावरून सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वैद्यकीय सेवेतील डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर येणारा कामाचा अधिकचा ताण तसेच रुग्णांच्या सेवेवर होत असलेला प्रतिकुल परिणाम याबाबी विचारात घेता उक्त रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) कार्यवाही सुरु आहे.

जिल्हा रुग्णालय नाशिक येथील भरलेल्या पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. :-

| अ.क्र | संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|
| १. | म.वै.आ.से. गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) | २४ | ११ |
| २. | म.वै.आ.से. गट-अ (ग्रेड पे रुपये ५४००) | ४२ | ४२ |
| ३. | अधिसेविका, वर्ग-२ | ०१ | ०० |
| ४. | प्रशासकीय अधिकारी | ०१ | ०१ |
| ५. | गट-क | ३०३ | २७२ |
| ६. | गट-ड | २९० | २७६ |
| एकूण | | ६६१ | ६०२ |

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) मधील विशेषज्ञ तसेच मुख्य प्रशासकीय अधिकारी संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी पत्र पाठविण्यात आली आहेत. कान, नाक, घसा व बधिरिकरणतज्ञ पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारशी प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार त्यांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

गट-क व गट-ड ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक स्तरावर सुरु आहे.

जिल्हा शासकीय रुग्णालय नाशिक येथे कंत्राटी (ऑन कॉल) तत्वावर आयपीएचएस अंतर्गत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यामधून खालील पदे भरण्यात आली आहेत.

| अ.क्र | विशेषज्ञ | भरलेली पदे |
|---|---|---|
| १. | स्त्री रोग | ६ |
| २. | बालरोग | १ |
| ३. | बधिरिकरणतज्ञ | ५ |
| ४. | सर्जन | ३ |
| ५. | दंतशल्यचिकित्सक | ५ |
| ६. | भिषक | ३ |
| ७. | अस्थिव्यंगोपचारतज्ञ | १ |
| ८. | बालरोगततज्ञ सर्जन | १ |
| एकूण | | २५ |

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रुपये ६६००) मधील नामनिर्देशनाची पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आली आहेत. तसेच पदोन्नती कोट्यातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कवरदरी, पो.किन्हीराजा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील समाज मंदिरासाठी दिलेल्या निधीचा अपहार झाल्याबाबत

**(६५) * ४२११९ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात लोकप्रतिनिधींनी मौजे कवरदरी, पो.किन्हीराजा (ता.मालेगाव, जि.वाशिम) येथील समाज मंदिरासाठी रुपये १० लक्ष निधी दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीपैकी रुपये ७.२५ लक्ष निधी खर्चीत दाखविण्यात आला असून रुपये २.७५ लक्ष निधी परत पाठविण्यात आला असे दाखविण्यात येवूनही सदर निधी शासनाकडे जमा झालेला नसून उक्त निधीचा जिल्हाधिकारी, नियोजन अधिकारी, कार्यकारी अभियंता यांनी संगनमताने अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच सदर निधी शासनाकडे जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडून सन्माननीय लोकप्रतिनिधी यांच्या आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मौजे कवरदरी, पो.किन्हीराजा, तालुका मालेगाव, जिल्हा

वाशिम येथील सभामंडप बांधण्यासाठी रुपये ९.८४ लक्ष एवढा निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांना मंजूर करण्यात आला होता.

(२), (३) व (४) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिमकडून मौजे कवरदरी, पो.किन्हीराजा, तालुका मालेगाव, जिल्हा वाशिम येथील सभामंडपाच्या बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्रत्यक्षात दिनांक २१/३/२०१७ रोजी निर्गमित करुन पूर्ण करण्यात आले आहे. सदर कामावर मंजूर निधीपैकी रुपये ६.७० लक्ष खर्च करून उर्वरित रुपये ३.१४ लक्ष एवढा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम यांचेकडून दिनांक १५/६/२०१८ रोजी शासन खाती जमा केला आहे. सदर प्रकरणी संबंधिताकडून खुलासा प्राप्त करून घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, वाशिम यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## वडवणी तालुक्यातील अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नसल्याबाबत

**(६६) * ४२२७३ श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी तालुक्यातील १३० अंगणवाड्यांपैकी ८३ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नसल्यामुळे त्या मिळेल त्या जागी भाडेतत्त्वावर सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४७ अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत असून त्या वाईट अवस्थेत असल्यामुळे वापराविना पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचा वापर गावातील अनेक लोक खाजगी मालमत्तेसारखा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंगणवाड्याचा दर्जा सुधारण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

वडवणी तालुक्यातील १३० अंगणवाडी केंद्रापैकी स्वत:ची इमारत असणारे ४७ अंगणवाडी केंद्र, शाळेच्या इमारतीत भरणारी २६ अंगणवाडी केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालयात भरणारी १७ अंगणवाडी केंद्र, समाज मंदिरात भरणारी १२ अंगणवाडी केंद्र आणि भाडे तत्त्वावर २८ अंगणवाडी केंद्रे आहेत.

(२) हे खरे नाही.

सर्व ४७ अंगणवाडी केंद्र सुस्थितीत, स्वच्छ असून परिसर स्वच्छ आहे, तसेच नियमितपणे अंगणवाडी केंद्रासाठी वापर चालु आहे.

(३) हे खरे नाही.

४७ अंगणवाडी केंद्रे सुस्थितीत असून त्याचा परिसर स्वच्छ असून त्याचा अंगणवाडी केंद्रासाठी दैनंदिन नियमितपणे वापर चालु आहे. अंगणवाडी केंद्राचा कोणीही खाजगी मालमत्तेसाठी वापर करत नाही.

(४) ४७ अंगणवाडी केंद्रे सुस्थितीत असून डिजीटल करण्यासंदर्भात महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार शहरात एम.एस.आर.डी.सी. प्रकल्पातंर्गत डिझेल व पेट्रोलवर सेझ लावल्याबाबत

**(६७) * ४२६१३ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार शहरात एम.एस.आर.डी.सी प्रकल्पातंर्गत डिझेल व पेट्रोलवर सेझ लावण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नंदुरबार आदिवासी जिल्हा असल्याने डिझेल व पेट्रोलवरील सेझ रद्द करण्याबाबत मागील अधिवेशनात आश्वासन देऊनही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी नंदुरबार जिल्ह्याला सेझपासून किती दिवसात मुक्ती मिळेल,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नंदूरबार नगरपरिषद क्षेत्रात मुल्यवर्धित कर कायद्याच्या कलम ९(१) च्या अधिकारान्वये दिनांक १६ मे, २०१६ च्या अधिसूचनेन्वये पेट्रोल वरील १% व डिझेल वर ३% असा लावण्यात आलेला कर हा सेस नसून अतिरिक्त कर आहे. सदर अतिरिक्त कर दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ पर्यंत लागू होता. दिनांक ३१/१२/२०१६ च्या अधिसूचनेन्वये सदर मुदत दिनांक ३१/१२/२०१९ पर्यंत वाढविण्यात आली.

(२) या संदर्भातले कोणतेही आश्वासन दिल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) लागू नाही.

(४) लागू नाही.

-----------------

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळामार्फत निधी वितरित करण्याबाबत

**(६८) * ४१२६१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती महामंडळाकडे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात निधी शिल्लक असतांनाही वितरित करण्यात आला नसल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजातील बेरोजगार युवकांना काम मिळावे यासाठी हे महामंडळ सुरु केले असतांनाही, या महामंडळात निधीचे वाटप न करण्याचे कारण काय आहे, तसेच दिल्ली येथे राष्ट्रीय महामंडळातून प्राप्त होणारा निधी देखील राज्यांना मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून निधी प्राप्त झाला नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत

**(६९) * ४२३५३ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३८०७८ ला दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जे.जे.रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्यासाठी ८८१ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असून महानगरपालिका प्रशासनाकडून त्यासाठी आवश्यक त्या परवानगी देण्यास विलंब होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच या सुपरस्पेशालिटी रुग्णालयामुळे हजारो गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळणार असल्याने या कामात विलंब करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याच्या आराखडयाला मान्यता देऊन सदरील कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
सर जे.जे. रुग्णालयाचे अतिविशेषोपचार रुग्णालय बांधकामांबाबत प्राप्त सुधारीत प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे उदरगांव ते वाकाव (ता.माढा, जि.सोलापूर) रस्ता दुरुस्त करण्यास मंजूरी देण्याबाबत

**(७०) * ४२६८४ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उदरगांव ते वाकाव (ता.माढा, जि.सोलापूर) हा ६ कि.मी.चा रस्ता दुरुस्त करण्यास मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूरी देऊन निधी वितरीत करण्याकरीता लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.ग्रामविकास मंत्री महोदयांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उक्त रस्ता दुरुस्त करण्याबाबत स्थानिक नागरिकांनीही संबंधितांकडे अर्ज विनंती केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिल्याचे आढळून येत नाही.

(२) स्थानिक नागरिकांनी तोंडी मागणी केली आहे.

(३) सदर रस्ता सन २०१३ मध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून दर्जोन्नत केला असल्याने त्या रस्त्याची निवड मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करता येत नाही. निविदाशर्तीनुसार दिनांक २८/३/२०१३ ते दिनांक २८/३/२०१८ या कालावधीत कंत्राटदाराने देखभाल दुरुस्ती अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कार्यवाही केली आहे. नियतकालीन दुरुस्ती अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हा परिषदेमध्ये फसवणूक केल्याबाबत

**(७१) * ४२६७७ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.अनंतराव गोटीराम देशमुख हे रायगड जिल्हा परिषदेमध्ये तृतीय श्रेणी कर्मचारी कार्यरत असतांना त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली असून त्यांना जिल्हा परिषदेमार्फत दरमहा निवृत्तीवेतन अदा केले जाते असे असतानादेखील श्री.देशमुख हे सहाय्यक निबंधक, खालापूर यांचे कार्यालयात "मजूर" म्हणून शासकीय नोंदणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेचे कायमस्वरुपी निवृत्तीवेतनधारक असताना सहाय्यक निबंधक यांनी खोटे दाखले दाखल करुन श्री.देशमुख यांनी शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने श्री.देशमुख यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) श्री.अनंतराव गोटीराम देशमुख सहाय्यक निबंधक, खालापूर यांचे कार्यालयाने मजूर म्हणून नोंदणी केलेली नाही. तथापि, त्यांची प्रबळगड मजूर सहकारी संस्था मर्या. हातनोली ता.खालापूर या संस्थेने मजूर म्हणून नोंदणी केली आहे.

(२), (३) व (४) प्रस्तूत प्रकरणी सहकारी अधिकारी (श्रे-२) सहाय्यक निबंधक कार्यालय, सहकारी संस्था, खालापूर यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## एक कर एक राष्ट्र या संकल्पनेतून जी.एस.टी. लागू झाल्याबाबत

**(७२) * ४१५५० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एक राष्ट्र एक कर या संकल्पनेतून जी.एस.टी. लागू झाल्यापासून महाराष्ट्रातील उद्योगांवर त्याचा विपरित परिणाम होत आहे, जी.एस.टी. कर प्रणालीमधील तफावतीमुळे व अंमलबजावणीतील कमतरतेमुळे एक राष्ट्र एक कर या संकल्पनेचे पालन झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच जी.एस.टी. कर प्रणाली लागू झाल्यापासून महाराष्ट्रातील छोटे व मध्यम उद्योग बंद होण्याच्या स्थितीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जी.एस.टी. लागू झाल्यानंतर सुध्दा सेल्स टॅक्स व इतर करांची आकारणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाची भूमिका काय आहे तसेच यासंदर्भात शासनस्तरावर काय निर्णय घेण्यात आला वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही. कारण जीएसटी अंमलबजावणीनंतर नोंदीत व्यापाऱ्यांच्या संख्येमध्ये ६०% वृद्धी झाल्याचे निदर्शनास आले आहे. जीएसटी पूर्व काळात राज्यामध्ये ८,५६,४७३ व्यापारी नोंदीत होते, जीएसटी नंतर नोंदीत व्यापाऱ्यांची संख्या १३,७८,८१४ झाली आहे.

(२) हे खरे नाही. जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर कर संकलनामध्ये वृद्धी निदर्शनास आली आहे. सन २०१७-१८ कालावधीमध्ये महसूलात १२.५% वृद्धी निदर्शनास आली आहे.

(३) घटना दुरुस्तीनुसार फक्त ६ वस्तूंवर कर आकारणी करण्याचा अधिकार राज्याला उपलब्ध आहे. त्यानुसार महाराष्ट्रात पेट्रोल, पेट्रोलियम क्रुड, हायस्पीड डिझेल, नॅचरल गॅस, अेविएशन टर्बाईन फ्युएल व लिकर यावर मूल्यवर्धित कर व केंद्रिय विक्रीकराची आकारणी करण्यात येत आहे. यावर जीएसटी आकारण्यात येत नाही.

(४) घटना दुरुस्तीप्रमाणे तसेच जीएसटी कौन्सिलच्या निर्णयानुसार व जीएसटी कायद्यानुसार जीएसटी व मूल्यवर्धित कर आकारणीचा निर्णय घेण्यात आला आहे.

-----------------

## शुल्क नियंत्रण समितीच्या शिफारशी डावलल्याबाबत

**(७३) * ४१४९८ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने स्थापन केलेल्या शुल्क नियंत्रण समितीच्या शिफारशींना डावलून राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी एम.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३५ ते ९० लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारण्याची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणी संदर्भात वैद्यकीय शिक्षण सचिवांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान संस्था चालकांशी चर्चा केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्था चालकांच्या मागणीबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांनी वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ३५ टक्के संस्थात्मक कोटयाकरिता शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारीत केलेले ३ पट शुल्काऐवजी ५ पट शुल्क आकारण्यास परवानगी देण्याबाबत मागणी केली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील एकूण मंजूर प्रवेशक्षमतेपैकी ५०% जागांचे प्रवेश हे शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्कानुसार केले जातात. उर्वरित ५०% संस्थात्मक कोटयापैकी ३५% कोटयासाठी (१५% एन.आर.आय कोटा वगळता) शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या ४ पट शुल्क आकारणे उचित होईल असे दिनांक २४/०४/२०१८ च्या शासन पत्रान्वये शुल्क नियामक प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.

----------------

## राज्यात "मागेल त्याला शेततळे" या योजनेंतर्गत सिंचन विहिरींची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(७४) * ४३५१० श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण** : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळावर मात करण्यासाठी व शेतकऱ्यांना सिंचनाची सोय करता यावी यासाठी "मागेल त्याला शेततळे" ही योजना सुरु केली असून रुपये दीड लाखाऐवजी ५० हजाराचे अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे व या योजनेंतर्गत सन २०१६-१७ ते २०१८-१९ या तीन वर्षात २ हजार विहिरींचे काम पुर्ण करायचे होते मात्र आतापर्यंत फक्त ८७२ विहीरींची (४३.६ टक्के) कामे पुर्ण करण्यात आली असून ११२८ विहीरींची (५६.४ टक्के) कामे अपूर्ण असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार माहे मार्च, २०१८ अखेर राज्यातील जिल्हानिहाय किती शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे तसेच चुकीच्या नियोजनामुळे विहिरीला पाणी न लागल्यामुळे शासनाचे कोटयावधी रुपये वाया गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिंचनासाठी सिंचन विहिरी देण्याच्या योजनेचा शासनाने आढावा घेऊन अपूर्ण असलेल्या विहिरींच्या बांधकामासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल** : (१) दुष्काळावर मात करण्यासाठी व शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध होण्यासाठी राज्यात "मागेल त्याला शेततळे" योजना व नागपूर विभागासाठी ११,००० सिंचन विहीरीचा कार्यक्रम शासनाने सुरू केले आहेत. "मागेल त्याला शेततळे"या योजनेंतर्गत दिनांक १५/६/२०१८ च्या दैनिक अहवालानुसार ८७,८२३ इतकी शेततळी पूर्ण झाली असून ६,३४५ इतकी शेततळी प्रगतीपथावर आहेत. तसेच ११,००० विहीरीच्या कार्यक्रमांतर्गत ७,१७२ इतक्या विहीरी पूर्ण झाल्या असून ४,१७७ विहीरीची कामे प्रगतीपथावर आहेत. त्यापैकी गोंदिया जिल्हयाला २००० विहीरीचे उदिष्ट देण्यात आले असून त्यापैकी १,२५३ विहीरी पूर्ण झाल्या असून ७४७ विहीरी प्रगतीपथावर आहेत.

(२) व (३) हे खरे नाही."मागेल त्याला शेततळे" योजनेंतर्गत विविध ७ प्रकारच्या शेततळयांसाठी कमाल रुपये ५०,०००/- इतके अनुदान अनुज्ञेय असून नागपूर विभागातल्या ११,००० विहीर कार्यक्रमांतर्गत रुपये २.५० लक्ष प्रति विहीर इतके अनुदान अनुज्ञेय आहे. या योजनांचा शासनस्तरावरुन वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. अद्यापपर्यंत "मागेल त्याला शेततळे" या योजनेचा लाभ ८७,८२३ इतक्या शेतकऱ्यांनी तर विहीरींचा लाभ ७,१७२ शेतकऱ्यांनी घेतला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रसाळगडच्या (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील संरक्षित वनक्षेत्र परिसरात वृक्षतोड होत असल्याबाबत

**(७५) * ४१७०४ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रसाळगडच्या (ता.खेड, जि.रत्नागिरी) पायथ्याशी असलेल्या १०० हेक्टरपेक्षा अधिक संरक्षित वनक्षेत्र (सहयाद्रीच्या रांगामध्ये सातगाव, धामणंद, पंधरागाव, बांदरीपट्टी, खाडीपट्टी) परिसरात गेल्या तीन महिन्यांपासून वृक्षतोड करून वाहनांतून दिवसा वाहतूक सुरू असल्याची बाब दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन वृक्ष लागवडीच्या नवनव्या योजना राबवत असताना दुसरीकडे वनविभाग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बेसुमार जंगलतोड सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध वृक्षतोडीवर आळा घालण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) रसाळगड (जि.रत्नागिरी) येथील संरक्षित अथवा राखीव वनक्षेत्रात वृक्षतोड झाली हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(७६) * ४१४१६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांच्या विविध मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी महासंघाने प्रधान सचिव, महिला व बालविकास विभाग यांना दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यवेक्षिका यांचा चुकीचा ग्रेडपे दुरुस्त करावा, भारत शासनाच्या महिला व बालविकास मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार पदोन्नती द्यावी, रिक्त असलेल्या बालविकास प्रकल्प अधिकारी पदाचा पदभार केवळ पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांना द्यावा यांसह विविध मागण्यांचा समावेश उक्त निवेदनात करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांनी दिलेल्या निवेदनाबाबत व पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ यांनी दिलेल्या निवेदनातील बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) यांच्या रिक्त पदांचा कार्यभार पर्यवेक्षिका यांना देणे याबाबत शासन निर्णय दिनांक २८/५/२०१५ अन्वये निर्णय घेण्यात आला आहे. तसेच पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांचे सेवाप्रवेश नियमात सुधारणा व उर्वरित मागण्याबाबत कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरोग निर्मुलन व वैद्यकीय उपचार योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(७७) * ४२७२८ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोगी शोधण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान राबविण्यात आलेल्या शोध मोहिमेत ११,०२९ रूग्ण सापडले असून सन २०१८ मध्ये १६,०६५ रूग्ण नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मोठ्या प्रमाणावर कुष्ठरोग्यांची संख्या असतानाही आरोग्य विभागाच्या कुष्ठरोग निर्मुलन विभागातील अपुऱ्या पदांमुळे शोध मोहिमेत व वैद्यकीय पुनर्वसनाच्या योजनेत अडचणी निर्माण होऊन असलेला निधी या कामी खर्च होत नसल्याचे निदर्शनास आले आहे तसेच वैद्यकीय पुनर्वसनाच्या योजनेंतर्गत कुष्ठरुग्णांचे पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियांचे प्रमाण सन २०१४-१५ पासून कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये हाती घेतलेली कुष्ठरोगी शोध मोहीम पुर्ण झाली आहे काय, तसेच या शोध मोहिमेत सन २०१६ च्या तुलनेत किती कुष्ठरोग्यांची भर पडली आहे,

(४) असल्यास, कुष्ठरोग निर्मुलन विभागात सहाय्यक संचालकाची, वैद्यकीय अधिकारी, अवैद्यकीय पर्यवेक्षकांची, अवैद्यकिय सहाय्यकाची एकूण किती पदे रिक्त आहेत व ती न भरण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुष्ठरोग निर्मुलन व वैद्यकीय उपचार योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत व उक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१८ मध्ये एकूण १६०६५ नवीन रुग्ण आढळले हे खरे आहे. परंतु दिनांक ०५ ते २२ फेब्रुवारी, २०१७ या कालावधीत फोकस्ड लेप्रसी कॅम्पेन या मोहिमेत २७९ रुग्ण शोधण्यात आले.

(२) हे खरे नाही.

सन २००५ मध्ये राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम सर्वसाधारण आरोग्य सेवामध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यासाठी सर्वसाधारण आरोग्य सेवातील कर्मचारी सर्वेक्षण करुन नविन कुष्ठरुग्ण शोधण्याचे काम करतात. कुष्ठरोग निर्मुलन विभागातील अपुऱ्या पदांमुळे कुष्ठरुग्ण शोधण्यात अडचण निर्माण झाली नाही, तसेच वैद्यकीय पुर्नवसनांतर्गत प्राप्त झालेल्या निधीपैकी १०० टक्के निधी खर्च झालेला आहे.

सन २०१४-१५ पासून दरवर्षी पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेसाठी पात्र रुग्णाच्या संख्येमध्ये घट झाली असल्यामुळे पर्यायाने पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेचे प्रमाण कमी होत आहे.

(३) माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये हाती घतलेली कुष्ठरोगी शोध मोहीम दिनांक ५ ते २२ फेब्रुवारी, २०१७ या कालावधी पुर्ण झाली आहे.

सन २०१६-२०१७ मध्ये घेण्यात आलेल्या फोकस लेप्रसि कॅम्पेनमध्ये २७९ नवीन कुष्ठरुग्ण शोधण्यात आले.

(४) राज्यात सहाय्यक या संवर्गाची २० पदे वैदयकिय अधिकारी यांची ५ पदे, अवैदयकिय पर्यवेक्षकाची ५१ पदे व अवैदयकिय सहाय्यक यांची १४४ पदे रिक्त आहेत.

सहाय्यक संचालक व वैद्यकिय अधिकारी यांच्या पद भरतीबाबत कार्यवाही शासनस्तरावर चालू असून, अवैद्यकिय पर्यवेक्षक, अवैद्यकिय सहाय्यकाची पदे भरतीबाबतही कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

अवैदयकिय सहाय्यक व अवैदयकिय पर्यवेक्षक या संवर्गाची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

राज्यात कुष्ठरोग निर्मुलन व वैदयकिय उपचार योजना प्रभावीपणे राबविणेसाठी अवैद्यकीय पर्यवेक्षक, अवैदयकिय सहाय्यक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य कर्मचारी व आशा स्वयंसेविका यांना दरवर्षी कुष्ठरोगविषयक प्रशिक्षण दिले जाते.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील साखरशेत प्राथमिक आरोग्य केंद्रातील पदे भरण्याबाबत

**(७८) * ४१८९५ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील साखरशेत प्राथमिक आरोग्य केंद्रात एकूण ४० पदापैकी फक्त १४ पदे भरलेली असून २६ पदे रिक्त असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थानिक रुग्णांना वेळीच उपचार मिळण्यासाठी सदर पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र साखरशेत येथे १५ मंजूर पदांपैकी १० भरली आहेत व ५ रिक्त आहेत.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्र साखरशेत येथील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही ग्रामविकास विभाग व संबंधित जिल्हा परिषदेकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंगणवाडयांची तपासणी करण्याबाबत

**(७९) * ४२४९८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९७ हजार अंगणवाडयांपैकी निम्या अंगणवाड्यांची तपासणी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून झाली नसून एकूण ७२ लाख बालकांच्या आरोग्याच्या तपासणीचे उद्दिष्ट निश्चित केलेले असतानाही त्यातील ३६ टक्के बालकांच्या आरोग्याची तपासणी केल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बालकांच्या आरोग्याची तपासणी करण्याचे काम हे सार्वजनिक आरोग्य विभागाचे असून राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत या बालकांना होणारे आजार, जन्मतः असलेले व्यंग, जीवनसत्वाच्या अभावामुळे होणारे आजार व अपंगत्व आदीचे वेळेवर निदान करुन उपचार करणे अपेक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळेवर तपासणी न केल्याने ठाणे व पालघर जिल्हयात मोठ्या प्रमाणात बालमृत्यू झाल्यामुळे राज्यात तीव्र पडसाद उमटले असतानाही बालकांच्या आरोग्याची तपासणी केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

अंगणवाडी तपासणी २ टप्प्यांमध्ये केली जाते. पहिला टप्पा हा एप्रिल ते सप्टेंबर व दुसरा टप्पा ऑक्टोबर ते मार्च असा असतो. म्हणजेच प्रयेक ६ महिन्याच्या टप्प्यात दरमहा १६.६ टक्के अंगणवाडया व १६.६ टक्के अंगणवाडयांतील बालकांची वैद्यकीय तपासणी होणे आवश्यक आहे.

त्यानुसार माहे एप्रिल, २०१८ मधील पहिल्या टप्प्यातील अंगणवाडी तपासणी ९३.७५१ पैकी १७,१३७ म्हणजेच १८.२ टक्के अंगणवाडयांची तपासणी झाली आहे व त्यातील ६५,६४,८६८ बालकांपैकी १०,७७,८९३ म्हणजेच १६.४२ टक्के बालकांची तपासणी झालेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

ठाणे जिल्हयामध्ये ३,५८६ अंगणवाडया असून त्यापैकी ३९८ अंगणवाडया तपासण्यात आल्या आहेत. म्हणजेच ११ टक्के काम पूर्ण झालेले आहे. तसेच, ठाणे जिल्हयात २,४७,९६४ बालके असून त्यापैंकी ३५,९४१ म्हणजेच १४.४ टक्के बालकांची तपासणी करण्यात आली आहे.

पालघर जिल्हयामध्ये ३,१७५ अंगणवाडया असून त्यापैकी ५३० अंगणवाडया तपासण्यात आल्या आहे. म्हणजेच १७ टक्के काम पूर्ण झाले आहे. तसेच, पालघर जिल्हयात २,२२,४०६ बालके असून त्यापैकी ३०,९२८ म्हणजेच १४ टक्के बालकांची तपासणी करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उध्दभवत नाही.

-----------------

## ठाणे वनवृत्त विभागांतर्गत येणाऱ्या टोकावडे (दक्षिण) वनपरिक्षेत्रात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८०) * ४१२८८ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे वनवृत्त्त विभागांतर्गत येणाऱ्या टोकावडे (दक्षिण) वनपरिक्षेत्रात थितबी आणि नाणेघाट पर्यटन क्षेत्र विकास योजनेत सुशोभिकरणाच्या नावाखाली लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) श्री.सुभाष विठ्ठल घरत, सदस्य जिल्हा परिषद ठाणे, मु.पो. वैशाखरे, ता.मुरबाड, जि.ठाणे यांचा सन २०१६-१७ मधील नानेघाट पर्यटन स्थळ विकसित करणे या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याबाबतचा तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांनी

दिनांक ०४/०४/२०१८ अन्वये चौकशी समिती गठीत केली. चौकशी समितीच्या अहवालानुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी व ठेकेदार यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हा परिषदेमधील सफाई कामगारांना नोकरीत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत

**(८१) * ४१८३६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हा परिषदेमधील सार्वजनिक बांधकाम विभागात १८ सफाई कर्मचारी गेली १० ते १२ वर्ष रोजंदारीवर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर सफाई कर्मचारी हे स्थानिक असून त्यांनी १० वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सफाई कर्मचाऱ्यांना नोकरीत कायमस्वरूपी सामावून न घेतल्यामुळे नोकरीकरीता आवश्यक असणारी वयोमर्यादा समाप्त होत असल्यामुळे त्यांच्यामध्ये चिंतेचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रोजंदारीवर काम करणाऱ्या सफाई कामगारांना नोकरीत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) ४ सफाई कामगार १० वी ते १२ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत.
(३), (४) व (५) सदर मजूर रोजंदारी तत्वावर (हातपावती) काम करीत असल्याने त्यांना कायम करण्यात आले नाही.

-----------------

## कमलापूर (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील प्राथमिक आरोग्यकेंद्रांतर्गत बाळंतीण महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(८२) * ४३५१४ श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कमलापूर (ता.अहेरी, जि.गडचिरोली) प्राथमिक आरोग्य कैंद्रातर्गत मांडरा येथे पंधरा दिवसांपूर्वी बाळंतीण झालेल्या सुशीला नामक महिलेचा वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाला, तसेच वेळेवर रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने ताटीगुडमटोला (ता.अहरी) येथील रहिवाशी विनोदा कृष्णा पेंदाम यांची घरीच प्रसुती होऊन दुसऱ्या दिवशी नवजात बालकाची प्रकृती बिघडून त्याचा उपचारादरम्यान अहेरी रुग्णालयात रविवारी मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त दोन्ही प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) होय, जिल्हास्तरावर चौकशी करण्यात आली असून सर्व संबंधितांविरुध्द कठोर कारवाई करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुसद वनपरिक्षेत्र (जि.यवतमाळ) येथे पॉलीहाऊस, ग्रीनहाऊस बांधकामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८३) * ४१२६३ श्री.हरिसिंग राठोड** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात पुसद वनपरिक्षेत्रांतर्गत दिग्रस रेंज मधील मध्यवर्ती रोप वाटिका सिंगद येथे पॉलीहाऊस, ग्रीनहाऊस बांधकामामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पॉलीहाऊस, ग्रीनहाऊसची मुळ किमंत रुपये ४० लाख ७० हजार असताना त्याची ई-निविदा प्रक्रिया न राबविता, कामाचे तुकडे पाडून कामे मॅनेज करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी आढळणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील रोपवाटीकेमध्ये पॉली हाऊस व ग्रीन हाऊस उभारण्याच्या कामाकरिता ०९ जानेवारी, २०१६ रोजी ई-निविदा प्रसिध्द करुन त्यात प्राप्त झालेल्या सर्वात कमी दराचे निविदेस मंजूरी प्राप्त करुन घेतली आहे. त्या आधारे त्याच कंत्राटदारास उपवनसरंक्षक, पुसद वन विभाग यांनी सिंगद रोपवाटीकेतील कामाचा कार्यारंभ आदेश दिलेला आहे.

(३) पुसद वन विभागातील सिंगद रोपवाटीकेतील पॉलीहाऊस व ग्रीनहाऊस उभारणीचे कामासंदर्भात मुख्य वनसरंक्षक (प्रादेशिक) यवतमाळ यांचे कार्यालयास दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने विभागीय वन अधिकारी (नियोजन) निर्देशन विभाग, यवतमाळ यांनी चौकशी केलेली असून त्यात गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे अधिकारी, कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) येथील बीएलएस रुग्णवाहीकेस एएलएस बनविण्याबाबत

**(८४) * ४२४२३ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथील अडयाळ ग्रामीण रुग्णालय व करडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील १०८ च्या बीएलएस प्रकारच्या रुग्णवाहिकेस एएलएस

बनविण्याबाबतची प्रस्तावित मागणी मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांना विंनती अर्ज देण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय. हे खरे आहे.
(२) ग्रामीण रूग्णालय, अडयाळ व प्राथमिक आरोग्य केंद्र, करडी येथे १८ ते ३० कि.मी नजिकच्या जिल्हा रूग्णालय, भंडारा व ग्रामीण रूग्णालय, लाखणे येथील ALS रूग्णवाहिका आवश्यकतेनुसार उपलब्ध करून दिली जाते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उत्पादित साखरेवर उपकर लावून इथेनॉलवरील जीएसटी कमी करण्याबाबत

**(८५) * ४२६९५ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढीव उत्पादनामुळे संकटात सापडलेल्या साखर उद्योगाला उभारी देण्यासाठी साखरेवर सेस (उपकर) लावणे व इथेनॉलचे उत्पादन वाढविण्यासाठी त्यावरील जीएसटी कमी करण्याबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, साखरेवरील सेसमधुन जमा होणाऱ्या रकमेचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ होणार असून त्याचा सर्वात मोठा फायदा महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांना होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णय अंमलात येण्याच्यादृष्टीने राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक ०४ मे, २०१८ रोजी झालेल्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीमध्ये साखरेवर सेसची आकारणी करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला व त्यावर अभ्यास करण्याकरिता पाच राज्याच्या अर्थमंत्र्यांची उपसमिती स्थापित झाली. सदर उपसमितीची बैठक दिनांक ०३/०६/२०१८ रोजी झाली. मात्र सदर उपसमितीने या संदर्भात कोणताही निर्णय घेतलेला नाही.

(२) यावर सद्य:परिस्थितीत भाष्य करता येणार नाही.

(३) साखरेवर सेसची आकारणीबाबत जीएसटी कौन्सिलने निर्णय घेतल्यानंतर केंद्र शासनाकडे त्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येईल.

(४) लागू नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये औषधे व उपकरणांच्या खरेदीबाबत

**(८६) * ४३०७५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १६ शासकीय वैद्यकिय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये औषधे व उपकरणांच्या खरेदीसाठी तसेच आवश्यक सेवेत काटकसर सुरु केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकिय महाविद्यालयांच्या औषध पुरवठादारांची दोन वर्षापासून देयके प्रलंबित असून शासनाने काटकसर केल्यामुळे राज्यातील वैद्यकिय महाविद्यालयांमध्ये औषधांचा तुटवडा जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) व (२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.